दैनिक
सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • ९५ • RNI : MAHMAR/2023/87818 • रविवार दि.२ फेब्रुवारी २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Agro. Tourism & Adventure Park
कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क
कोरोडा (खोडेगाव), पुलगाव जवळ, ता. देवळी जि. वर्धा

मध्यमवर्गीयांचे ड्रीम बजेट : भारताच्या आर्थिक इतिहासातील मैलाचा दगड ठरणारा अर्थसंकल्प

देवेंद्र फडणवीसांनी केले अर्थसंकल्पाचे स्वागत



मुंबई (वृत्तसंस्था)–नव्या कररचनेचा मध्यमवर्गीयांसह नोकरदारांना फायदा होईल. मोदी सरकारने शेती विकासासाठी नवी योजना आणली आहे. त्यांचा फायदा शेतकऱ्यांच्या उत्पनवाढीसाठी होणार आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. देवेंद्र फडणवीस पुढे बोलताना म्हणाले की, १२ लाखांपर्यंत उत्पन्न करमुक्त करण्यात आले आहे. यामुळे मध्यमवर्गीय आणि नोकरदार वर्गाल फायदा होणासर आहे. त्यासाठी मी अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांचे आभार मानतो. युवांसाठी वेगवेगळे मिशन आणि स्वप्नांना भरारी देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. भारत सर्वसमावेशक अर्थव्यवस्थेकडे चालला आहे.देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्यांना काय दिले हे बजेटमध्ये सांगण्याची पद्धत बंद करण्यात आली आहे. महाराष्ट्राला मोठा निधी मिळेल असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला आहे. बजेटमध्ये महाराष्ट्राला बरेच काही मिळाले आहे. सायंकाळी त्या संदर्भात सर्व माहिती येईल. देवेंद्र फडणवीस म्हणाले की, बजेटचा सर्वाधिक फायदा हा महाराष्ट्र घेणार आहे. हा अर्थसंकल्प देशाला नवी दिशा देणारा आहे. यामुळे चडचए क्षेत्रात मोठा फायदा झाला आहे. शेती क्षेत्रात गुंतवणुकीची मोठी घोषणा करण्यात आली आहे. कॅन्सरच्या रुग्णांसाठी मोठा दिलासा केंद्र सरकारने या बजेटमधून दिला आहे.

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, कापसाच्या नवीन मिशनचा महाराष्ट्राला सर्वाधिक फायदा होणार आहे. कारण आपल्याकडे मोठ्या प्रमाणावर कापूस उत्पादन आहे. ५५ हजार हेक्टरवर आपल्या राज्यात कापसाचे उत्पादन होते.देवेंद्र फडणवीस म्हणाले की, गुंतवणूक करताना जास्त व्याज आणि रिटर्न मिळते हे पाहण्यापेक्षा त्यात किती रिस्क आहे याकडे लक्ष दिले पाहिजे. तर मी कधीच गुंतवणूक केली नाही, आम्ही माणसांमध्ये गुंतवणूक करणारा व्यक्ती आहे.देवेंद्र फडणवीस म्हणाले की, हेल्थ क्षेत्र बघितले तर कॅन्सरसारख्या वेगाने वाढणाऱ्या आजाराला दिलासा देण्याचा प्रयत्न केला आहे. प्रत्येक सरकारी रुग्णालयात कॅन्सर डे केअर सेंटर काढण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. २०० डे केअर सेंटर एकाच वर्षांत सुरू करण्यात येणार आहे. परदेशात त्यांच्यावर चांगले औषधी आहेत त्यावर मोठी ड्युटी असल्याने ते घेता येत नव्हते ती आता संपूर्णपणे बंद करण्यात आली आहे. कॅन्सर रुग्णांसाठी हा चांगला निर्णय आहे.

शिक्षणाच्या खासगीकरणावर भर आ.सुधाकर अडबाले यांची टीका

चंद्रपूर । प्रतिनिधी

केंद्र सरकार शासकीय शिक्षण संस्थांऐवजी खासगी संस्थांना प्रोत्साहन देत आहे. सरकारी शाळा आणि उच्च शिक्षण संस्थांसाठी थेट निधी वाढवण्याऐवजी स्कॉलरशिप किंवा कर्ज स्वरूपात मदत केली जात आहे. शिक्षण क्षेत्रासाठी ऋछझ च्या ६% खर्चाची शिफारस असूनही, सरकारने अपेक्षेइतका निधी वाढवलेला नाही. यामुळे सरकारी शाळा आणि महाविद्यालयांमधील सुविधा सुधारण्यास मर्यादा राहतील.



प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणासाठी विशेष काही घोषणा नाहीत. सरकारी शाळांमधील शिक्षक भरती, डिजिटल शिक्षण सुविधा आणि विद्यार्थ्यांसाठी मदतीबाबत कोणतेही ठोस उपाय प्रस्तावित नाही. उच्च शिक्षणासाठी मिळणाऱ्या शिष्यवृत्ती आणि मदतीच्या योजना तुलनेने कमी प्रमाणात वाढवण्यात आल्या आहेत. परिणामी, गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबांसाठी महागाईच्या काळात शिक्षण घेणे अधिक कठीण होऊ शकते. वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक पदभरतीबाबत देखील ठोस उपाय करण्यात आलेले नाही. कौशल्य विकासासाठी काही घोषणा केल्या असल्या तरी त्या पुरेशा नाहीत. ग्रामीण भागातील तरुणांना आधुनिक कौशल्य प्रशिक्षण आणि रोजगाराच्या संधी पुरेशा प्रमाणात मिळत नसल्याची टीका आमदार सुधाकर अडबाले यांनी केली आहे.

सर्वसमावेशक व विकसित भारताच्या स्वप्न पुर्तीकडे नेणारा अर्थसंकल्प–हंसराज अहीर

चंद्रपूर । प्रतिनिधी

पंतप्रधान नरेंद्र मोदी जी यांच्या नेतृत्वातील सरकारचा आठवा केंद्रीय अर्थसंकल्प अर्थमंत्री श्रीमती निर्मला सितारमण यांनी संसदेत सादर केला असून हा अर्थसंकल्प २०४७ मधील विकसित भारताची 'ब्ल्यू प्रिंट' असून हा अर्थसंकल्प गरीब, युवाशक्ती, शेतकरी, महिलाशक्ती व मागासवर्गीय घटकांना समर्पित, ऐतिहासिक व देशाच्या विकासाला नव्या उंचीवर नेणारा असल्याचे राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष तथा पूर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर यांनी म्हटले आहे.



या अर्थसंकल्पात शेती, उद्योग, स्टार्टअप, शिक्षण, आरोग्य, स्वयरोजगार व रोजगारासह अन्य महत्वपूर्ण क्षेत्रात पायाभुत सुविधांना दृष्टीपथात ठेवून देशाच्या विकासाला भरीव आर्थिक तरतुदीतून नवी दिशा देण्याचा प्रयत्न सरकारने केला आहे. १.७० कोटी शेतकऱ्यांसाठी प्रधानमंत्री धनधान्य कृषी योजना, नोकरदार करदात्यांना रू १२.७५ लाखावर आयकर मुक्ती, टॅक्स रिटर्न फाईलकरिता ४ वर्षांची मुद्दत, कॅन्सर उपचारात सुट व औषधे आयात करमुक्त, किसान क्रेडिट कार्डची मर्यादा ५ लाख केल्याने ७ कोटीहून अधिक शेतकरी मच्छिमारांना दिलासा, दुर्मिळ व गंभीर आजारावरील ३६ औषधे कस्टम ड्युटी मुक्त, जमीन नोंदी आधुनिकीकरण, ज्येष्ठ नागरिकांची टि.डी.एस मर्यादेत १लाख पर्यंत वृध्दी, पुढील ३ वर्षात जिल्हा रूग्णालयात डे केयर कॅन्सर सेंटरची स्थापना, वैद्यकीय शिक्षणात १० हजार जागांची वाढ, कापुस उत्पादकांसाठी ५ वर्षांच्या योजनेसह अनेक लोकाभिमुख, विकासाभिमुख योजना कार्यान्वित करून देशाला समृध्द व विकसित राष्ट्राकडे नेणारा हा अर्थसंकल्प असल्याचे हंसराज अहीर यांनी म्हटले आहे.

केंद्राच्या बजेट मध्ये महाराष्ट्राच्या पदरी घोर निराशा

चंद्रपूर । प्रतिनिधी

देशातील जनतेला खोटी वचने व पोकळ आश्वासने देऊन तिसऱ्यांदा सत्ता काबीज करणाऱ्या केंद्रातील महायुती सरकारने केंद्रसकारच्या सत्तेचा मुख्य आधार असलेल्या बिहार राज्याच्या निवडणुका तोंडावर बघताच बिहार राज्यावर भरभरून प्रेमाचा वर्षाव करीत आज महाराष्ट्र राज्याला सावत्रपणाची वागणूक देत इतर राज्यांच्या तुलनेत सर्वाधिक घोर निराशा करणारे बजेट सादर केले.

या बजेट मधे केवळ मुंबई- अहमदाबाद सुपरफास्ट रेल्वे, मेट्रो ट्रेन यांच्या विकासापलिकडे काहीच नसून महाराष्ट्रातील शेतकरी, युवक, कामगार व जनसामान्यांच्या तोंडाला पाने पुसणारे आहे . राज्यात वाढलेली प्रचंड महागाई, बेरोजगारी दूर करण्याऐवजी सरकारच्या नव्या धोरणानुसार आकारण्यात येणारा विविध कर व लादण्यात आलेल्या जाचक अटींमुळे राज्याच्या विकासाच्या गतीला खीळ बसविणारे आहे. मेक इन इंडियाचे आता म्याणुफॅकचर इंडिया असे करून जुन्या बाटलीत नवे औषध भरण्याचे काम सरकारने केले आहे. या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांना दिलेले कर्जमाफीचे आश्वासन पुरते फोल ठरले.तर रोजगाराभिमुख राज्य घडविण्याचा डंका पिटणाऱ्या सरकारचे आश्वासन हवेत विरल्याचे दिसून येते. एकिकडे बिहार राज्याच्या निवडणुका समोर



असल्याने बिहार राज्याला भरभरून द्यायचे आणि दुसरीकडे सर्वाधिक कर भरणाऱ्या राज्यांच्या वाट्याला अत्यल्प असा तोकडा निधी देऊन विकासाचा ओहापोह करायचा हाच या सरकारच्या अर्थसंकल्पा मागचा एकमेव उद्देश असल्याचे स्पष्ट जाणवते आहे. राज्याला शेती, उद्योग, रोजगार, आरोग्य, शिक्षण यासाठी भरभरून निधी मिळेल असे वाटत असताना केंद्राच्या या अर्थसंकल्पाने केलेली घोर निराशा राज्याला अधोगतीकडे नक्कीच नेणार हे स्पष्ट होते. महाराष्ट्रातील जनतेला वाऱ्यावर सोडून केंद्राने अर्थसंकल्पात दाखविलेला दुजाभावाचा हा राज्यावरील अन्याय करणारा आहे. अशी प्रतिक्रिया राज्याचे माजी विरोधी पक्षनेते,ब्रम्हपुरी विधानसभा क्षेत्र आमदार विजय वडेट्टीवार यांनी व्यक्त केली आहे.

लाडकी बहिणीचे बनावट अर्ज करणाऱ्यांवर गुन्हे दाखल:मंत्री अदिती तटकरे यांची माहिती

मुंबई (वृत्तसंस्था)–बनावट कागदपत्रांच्या आधारे योजनेचा लाभ घेणाऱ्या बहिणींवर पोलिसांत रीतसर गुन्हा दाखल करण्यात आला आहे, अशी माहिती महिला आणि बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी दिली आहे.

दरम्यान आदिती तटकरे पुढे बोलताना म्हणाल्या की, बनावट अर्जदारांना मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत एकदाही सन्मान निधी वितरित झाला नसून, सखोल चौकशी करून त्यांच्यावर कडक कारवाई करण्यासाठी कायदेशीर प्रक्रिया सुरू असल्याचे त्यांनी म्हटले आहे.मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत बनावट लाभार्थ्यांची नोंदणी करण्याचा गैरप्रकार हा स्थानिक अंगणवाडी सेविकांच्या सजगतेमुळे अर्ज पडताळणीच्या वेळी सप्टेंबर महिन्यातच निदर्शनास आला आहे. याबाबत ४ ऑक्टोबर रोजी पोलिसांत रीतसर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.आदिती तटकरे म्हणाल्या की, सदर बनावट अर्जदारांना मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत एकदाही सन्मान निधी वितरित झाला नसून, सखोल चौकशी करून त्यांच्यावर कडक कारवाई करण्यासाठी कायदेशीर प्रक्रिया सुरू आहे. महिला व बालविकास विभाग अर्जदारांच्या छाननीबाबत अत्यंत सजग असून कोणत्याही प्रकारची फसवणूक करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येत आहे. महिला मतदार डोळ्यासमोर ठेवून विधानसभा निवडणुकीपूर्वी महायुती सरकारने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरू केली. या योजनेअंतर्गत सरसकट प्रत्येक अर्जदार महिलेला प्रति महिना दीड हजार रुपये खात्यात पाठवण्यात आले.राज्य सरकारच्या महिला व बालविकास विभागाकडून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा जानेवारी महिन्याच्या हप्त्याच्या लाभाचं वितरण सुरु आहे. २४ जानेवारी २०२५ रोजी १.१० कोटी लाभार्थी महिलांच्या खात्यात सन्मान निधी वर्ग करण्यात आला. त्यानंतर २५ जानेवारीला १.३१ कोटी महिलांच्या खात्यात सन्मान निधी जमा करण्यात आला आहे. जानेवारी महिन्यात जवळपास २.४१ कोटी महिलांच्या खात्यात जानेवारी महिन्याचा लाभ जमा झाला आहे.

संत कोंडय्या महाराज देवस्थानाच्या विकासात खंड पडू देणार नाही-आ.सुधीर मुनगंटीवार यांनी दिला विश्वास

श्री संत परमहंस कोंडय्या महाराज देवस्थान धाबा येथील १ कोटी ४९ लक्ष रुपयांच्या सांस्कृतिक सभागृहाचे लोकार्पण

धाबा । प्रतिनिधी

श्री संत परमहंस कोंडय्या महाराज देवस्थानातील विकासकामांसाठी आजवर जेव्हा जेव्हा माझ्याकडे मागणी करण्यात आली तेव्हा तेव्हा ती मंजूर केली. ज्यावेळी सभागृहाच्या बांधकामासाठी मागणी आली, महाराजांच्या कृपेने आपण ताबडतोब १ कोटी ४९ लक्ष रुपयांची मागणी पुर्ण केली. यापुढेही देवस्थानाच्या विकासात खंड पडू देणार नाही, असा शब्द राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी दिला.

आ. सुधीर मुनगंटीवार यांनी मंजूर केलेल्या धाबा येथील श्री संत परमहंस कोंडय्या महाराज देवस्थानातील सांस्कृतिक सभागृहाचे त्यांच्या हस्ते लोकार्पण झाले. या सभागृहासाठी आ. श्री. मुनगंटीवार यांनी मंत्री असताना १ कोटी ४९ लक्ष रुपये मंजूर केले होते. यावेळी त्यांनी संत कोंडय्या महाराजांच्या समाधीस्थळाचे दर्शन घेतले. देवस्थानाचे विश्वस्त मंडळ आणि ग्रामस्थांनी त्यांचा भव्य सत्कार केला. या कार्यक्रमाला सिरपूर-कागजनगर (तेलंगणा) आमदार डॉ. हरीशबाबू पालवाई, राजुराचे आमदार देवराव भोंगळे, संस्थेचे अध्यक्ष सुहास माडुरवार, माजी अध्यक्ष अमर बोडलावार, दीपक बोनगिरवार, राजाभाऊ चिलमंतवार, विजयराव देशमुख,रामकृष्ण सांगडे,शेगमवार महाराज,बबन पत्तीवार,किशोर अगस्ती, मुनेश्वर हडपे,अशोक भस्की यांची प्रमुख उपस्थिती होती.आ. मुनगंटीवार यांनी यावेळी विचार मांडले. ते म्हणाले, 'सभागृहाच्या बांधकामासाठी माझ्याकडे ५० लक्ष रुपयांची मागणी करण्यात आली. पण चांगलं घडविण्यासाठी संत आपल्याला बुद्धी देतात. मी ५० लाख रुपयांच्या ऐवजी १ कोटी रुपयांना मान्यता दिली. सभागृह बांधायला घेतले तेव्हा पैसे कमी पडत असल्याचे लक्षात आले. त्यामुळे अतिरिक्त ४९ लाख रुपये देऊन काम पूर्ण केले. आज या सभागृहाचे लोकार्पण करताना मनस्वी आनंद होत आहे.'तीर्थक्षेत्र योजनेंतर्गत मंदिराला सोलर यंत्रणा उपलब्ध करून दिली. याशिवाय वॉटर एटीएम, पेव्हर ब्लॉक, सिमेंट रोड, शववाहिका आणि सीएसआर निधीतील रुग्णवाहिका देखील उपलब्ध करून दिली. संस्थानाने प्रत्येकवेळी जे मागितले ते देण्याचा प्रयत्न केला, भविष्यातही त्यासाठी कटिबद्ध



आहे, अशी ग्वाही देखील आ. मुनगंटीवार यांनी दिली. हा परिसर शक्तिशाली आहे. इथे जे येतात ते सुख समाधान घेऊन जातात. त्यामुळे आता अपुऱ्या सोयी सुविधांचा प्रश्न सोडविण्याचा आणि यात्रेकरुंना भेडसावणाऱ्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न संस्थानाने करावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.मला संधी मिळाली तेव्हा महाराष्ट्रातील यात्रास्थळांना मदत केली. पंढरपूरची वारी हरितवारी व्हावी यासाठी अर्थमंत्री म्हणून निधी उपलब्ध करून दिला. पंढरपूरमध्ये उत्तम असे तुळशी वृंदावन करून दिले. पंढरपूरलाच मल्टिप्लेक्सच्या धरतीवर ७० कोटी रुपये खर्चाचे संकीर्तन सभागृह केले. भीमाशंकरला १५० कोटी रुपये देऊन ज्येष्ठांसाठी दर्शनाची व्यवस्था. घृष्णेश्वरला महादेव वन निर्माण केले. भगवान महादेवांचे मंदीर छत्रपती शिवाजी महाजारांचे कुलदैवत आहे. मंदिर उंचावर असल्याने तिथे बेलाची पाने उपलब्ध व्हायची नाहीत. तातडीने बैठक घेतली आणि बाराशे बेलाची झाडं लावली. आज दहा ते बारा फुटाची बेलाची झाडं दिमाखात उभी आहेत आणि महाशिवरात्रीला बेलाची पानंही मोठ्या प्रमाणात आहेत, असेही आ. सुधीर मुनगंटीवार म्हणाले. कोराडीच्या जगदंबा मंदिराचे सौंदर्यीकरण करण्यासाठी २०० कोटी रुपये उपलब्ध करून दिल्याचेही ते म्हणाले.

आश्वासन अपूर्ण राहणार नाही

धाबा उत्तम व्हावा यासाठी १४ कोटी रुपयांचा प्रस्ताव आला आहे. तो पूर्ण करण्यासाठी नक्की प्रयत्न करेन. मंजूर करण्याची शक्ती परमेश्वर देईल. पण आश्वासन अपूर्ण राहणार नाही, यादृष्टीने लवकरच आढावा बैठक घेणार आहे. यात कोणतेही काम सुटणार नाही, याची काळजी घेतली जाईल, असा विश्वासही त्यांनी दिला.

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाचा विकास राष्ट्रीय पर्यटन स्थळ म्हणून करावा–आ.सुधीर मुनगंटीवार

चंद्रपूर जिल्हा नियोजन समितीच्या सभेत ठराव पारित

चंद्रपूर । प्रतिनिधी

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारमण यांनी आज केंद्रीय अर्थसंकल्प सादर करताना देशातील ५० पर्यटन स्थळांचा विकास करण्याचा मनोदय जाहीर केला आहे. चंद्रपूर जिल्हयातील ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प अर्थात ताडोबा राष्ट्रीय उद्यान महाराष्ट्राचा पर्यटन विषयक मानबिंदू आहे. हे जागतीक दर्जाचे पर्यटन स्थळ आहे. ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पामध्ये सर्वाधिक वाघ असून विविध प्राणी देखील या व्याघ्र प्रकल्पात आहेत. कोअर झोन तसेच बफर झोन मध्ये मोठ्या संख्येने पर्यटक सातत्याने येत असतात. ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाचा विकास करण्यासाठी केंद्र शासनाने जाहीर केलेल्या ५० पर्यटन स्थळामध्ये या प्रकल्पाचा समावेश व्हावा अशी मागणी आ. सुधीर मुनगंटीवार यांनी केली.

चंद्रपूर जिल्हा नियोजन समितीने पारित करावा व हा ठराव केंद्र व राज्य शासनाकडे पाठवावा असेही ते म्हणाले.मूल तालुक्यातील सोमनाथ हे प्रसिद्ध पर्यटन व तीर्थस्थळ असून या ठिकाणी मोठया संख्येने भाविक व पर्यटक सातत्याने येत असतात. या ठिकाणी श्री शंकराचे जागृत देवस्थान आहे. हा परिसर निसर्गरम्य असून मोठा धबधबा या ठिकाणी आहे. या ठिकाणी भाविक व पर्यटकांना सोयी सुविधा उपलब्ध व्हाव्या या दृष्टीने या स्थळाला ब वर्ग दर्जा देण्याचा



ठराव पारित करण्याची मागणी आ मुनगंटीवार यांनी यावेळी केली.चंद्रपूर जिल्हयातील गोंडपिपरी तालुक्यातील श्री क्षेत्र धाबा येथे संतश्री परमहंस कौंडण्या महाराज यांचे समाधीस्थळ आहे. मोठया प्रमाणावर भाविक याठिकाणी सातत्याने येत असतात. भाविकांसाठी सोईसुविधा अपु-या आहेत. दरवर्षी जानेवारी महिन्यात याठिकाणी मोठी यात्रा भरते. या तिर्थस्थळाचा समावेश ब वर्गात करण्याची आवश्यकता आहे. सदर तिर्थस्थळाला ब वर्ग दर्जा मिळण्याबाबतचा ठराव पारित करण्याची मागणी आ. सुधीर मुनगंटीवार यांनी केली. हे तिन्ही ठराव जिल्हा नियोजन समितीच्या सभेत मंजूर करण्यात आले असून पुढील कार्यवाहीसाठी केंद्र व राज्य शासनाला सादर करण्यात येणार आहे.

प्रगतशील शेतकरी सागर गंगाधर चोभे यांना राज्यस्तरीय पुरस्काराने गौरव

वैजापूर । प्रतिनिधी

वैजापूर तालुक्यातील हनुमंतगाव येथील प्रगतशील शेतकरी सागर गंगाधर चोभे यांनी आपल्या आधुनिक शेतीतून संपूर्ण पंचक्रोशीत आपली ओळख निर्माण केली आहे. शेती परवडत नाही, असे मानणाऱ्यांसाठी त्यांनी आदर्श घालून दिला असून, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून विक्रमी उत्पादन घेत शेतकरी उद्योजकतेचा उत्कृष्ट नमुना सादर केला आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना राज्यस्तरीय पुरस्काराने गौरवण्यात येणार आहे. हा पुरस्कार ९ फेब्रुवारी रोजी प्रदान केला जाणार आहे.

सागर चोभे यांनी शेतीत शेडनेट, ट्रॅक्टर, अत्याधुनिक अवजारे, शेततळे आणि संपूर्ण ठिबक सिंचन प्रणाली उभारली आहे. विशेषतः त्यांनी २० गुंठ्यातील शेडनेटमध्ये शिमला मिरचीचे विक्रमी २० टन उत्पादन घेतले असून, त्यातून नऊ ते दहा लाख रुपयांचे उत्पन्न मिळवले आहे. त्यामुळे 'शिमला मिरची किंग' म्हणूनही त्यांची ओळख निर्माण झाली आहे.

सागर चोभे परिसरातील शेतकऱ्यांना शेतीविषयक मार्गदर्शन करत असून, त्यांना सरकारी योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी सतत प्रयत्नशील असतात. रासायनिक खतांचा वापर कमी करण्यासाठी त्यांनी गांडूळ खत प्रकल्प उभारला आहे. त्यांच्या आधुनिक शेतीचा अभ्यास करण्यासाठी माजी मंत्री सुभाष देसाई



(२०२०) आणि जिल्हाधिकारी सुनिल चव्हाण (२०२१) यांच्यासह अनेक कृषी अधिकाऱ्यांनी त्यांची भेट घेतली होती.

त्यांच्या यशात आई-वडील आणि भाऊ ऋतुराज गंगाधर चोभे यांचे मोठे योगदान आहे. राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाल्याने पंचक्रोशीतील शेतकऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले असून, त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

इंदिरा हायस्कूल सेलडोह येथे दीपक ढगे व कल्याणी सलोडकर यांचा भावपूर्ण सत्कार

सेलडोह । प्रतिनिधी

इंदिरा हायस्कूल, सेलडोह येथे शाळेचे ज्येष्ठ शिक्षक दीपक ढगे आणि कु. कल्याणी सलोडकर यांचा सन्मान सोहळा उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात पार पडला. दीर्घ काळ विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून शिक्षण क्षेत्रात मोलाचे योगदान दिल्यानंतर ढगे यांचा शाळेतील हा शेवटचा दिवस असल्याने कार्यक्रम अधिकच भावुक झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इंदिरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष दादाजी भेंडे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून मुख्याध्यापिका बोधाने , माजी मुख्याध्यापक गिरडकर, इंदिरा हायस्कूल सालई येथील मुख्याध्यापक पाटील , भानखेडा येथील मुख्याध्यापक कदम यांच्यासह माजी शिक्षक खोडे , गवळी,



भारती , बापूराव चौधरी, वार्ताहर माणिकराव देडे, शुक्ला आणि शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी अध्यक्षांच्या हस्ते ढगे यांचा शाल आणि श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. ढगे उद्यापासून शाळेत दिसणार नाहीत, ही जाणीव विद्यार्थ्यांसाठी भावनिक ठरली. संपूर्ण कार्यक्रम अतिशय हृदयस्पर्शी वातावरणात पार पडला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पगारे यांनी केले, तर आभार प्रदर्शन पातोंड यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सोनटक्के , उमाटे , पाटील , देशमुख, टेंभुर्णी आणि अनिल सोनटक्के यांनी विशेष सहकार्य केले.

कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी साकारले टेरेस गार्डन : शाश्वत जीवनशैलीला मिळाले प्रोत्साहन

सोलापूर । प्रतिनिधी

शाश्वत राहणीमान आणि शहरी बागकामाला चालना देण्यासाठी डॉ. शरदचंद्र पवार कृषी महाविद्यालय, बारामती यांच्या वतीने मौजे दहिगाव, ता. माळशिरस येथे टेरेस गार्डन प्रात्यक्षिक आयोजित करण्यात आले. कृषी कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत घेण्यात आलेल्या या उपक्रमात विद्यार्थिनींनी पुनर्वापरयोग्य साहित्य आणि सेंद्रिय खतांचा वापर करून समृद्ध टेरेस गार्डन तयार करण्याचे तंत्र प्रत्यक्ष करून दाखवले.

या उपक्रमाचे नेतृत्व प्रा. गणेश शिंदे यांनी केले, तर समृद्धी बोडके, मीनल माने, राजश्री सूर्यवंशी, संचिता डोंबाळे,



दमयंती वनवे, मधुरा कोंडे, शितल शिंदे यांनी प्रत्यक्ष बाग तयार करून उपस्थितांना मार्गदर्शन केले.कु. मीनल माने म्हणाली, बागकाम हा केवळ छंद नसून, शाश्वत भविष्यासाठी योगदान देण्याचा मार्ग आहे. टेरेस गार्डनमुळे लहान जागेतही अन्न उगवणे शक्य होते आणि आर्थिक फायदा देखील मिळू शकतो.या उपक्रमाला स्थानिक रहिवाशांचा मोठा प्रतिसाद मिळाला. त्यांनी विद्यार्थिनींच्या प्रयत्नांचे कौतुक करत स्वतःच्या घरांमध्येही टेरेस गार्डन उभारण्याची इच्छा व्यक्त केली. हा उपक्रम शाश्वत जीवनशैली आणि शहरी शेतीसाठी प्रेरणादायी ठरला आहे.

अमरावतीचे खासदार बळवंत वानखेडे यांचा गंगाखेड येथे सत्कार



गंगाखेड । प्रतिनिधी

अमरावतीचे खासदार बळवंत वानखेडे यांच्या गंगाखेड दौऱ्यानिमित्त तालुका व शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने शहर कार्यालयात त्यांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाला रिपब्लिकन पक्षाचे नेते डॉ. सिद्धार्थ भालेराव, काँग्रेस तालुकाध्यक्ष गोविंद यादव, शहराध्यक्ष शेख युनूस, जिल्हा उपाध्यक्ष ड. हनुमंत जाधव, युवक प्रदेश सचिव प्रणित खजे यांच्यासह अविनाश भोसले, बालाजी पवार, सय्यद खलीलभाई, शेख अजीम, इनायतुल्ला पटेल, शेख जावेद, खाजाभाई गुत्तेदार, फारूक पटेल, मोहसीन भाई, सय्यद इस्माईल आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

मा.आ.सिताराम घनदाट पुन्हा सक्रिय

गंगाखेडमध्ये बैठकीचे आयोजन

गंगाखेड । प्रतिनिधी

विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर काहीसे शांत असलेले गंगाखेड विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार सिताराम घनदाट पुन्हा सक्रिय झाले आहेत. ते १ फेब्रुवारी २०२५ रोजी गंगाखेड येथील निवासस्थानी दाखल झाले असून, आगामी राजकीय दिशा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.



ही बैठक २ फेब्रुवारी २०२५ रोजी दुपारी ४ वाजता सिताराम घनदाट यांच्या संपर्क कार्यालयात होणार आहे. घनदाट मामा मित्र मंडळाच्या कार्यकर्त्यांसह विधानसभा प्रमुख, तीनही तालुकाध्यक्ष, जिल्हा परिषद व पंचायत समिती सर्कल प्रमुख, तसेच आजी-माजी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.या बैठकीत घनदाट यांच्या भविष्यातील राजकीय वाटचालीसंदर्भात महत्त्वपूर्ण चर्चा होणार की ही केवळ कौटुंबिक बैठक असेल, याबाबत विधानसभा मतदारसंघात चर्चेला उधाण आले आहे.

स्कॉर्पिओतून ५३ किलो गांजा तस्करी शिक्रापूर पोलिसांची मोठी कारवाई

शिरूर । प्रतिनिधी

आलिशान स्कॉर्पिओ वाहनांमधून गांजाची तस्करी केली जात असल्याची माहिती मिळाल्यानंतर शिक्रापूर पोलिसांनी तातडीने सापळा रचत मोठी कारवाई केली. या कारवाईत तब्बल ५३ किलो गांजा जप्त करण्यात आला असून, दोन स्कॉर्पिओ वाहनांसह सहा जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

शिक्रापूर पोलीस ठाणे हद्दीत पुणे-नगर महामार्गावरून गांजा तस्करी होत असल्याची गोपनीय माहिती ट्रॅफिक पोलीस मिलिंद देवरे यांना मिळाली. त्यांनी तातडीने ही माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांना कळवली.

पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी सापळा



रचला. पुणे-नगर महामार्गावर संशयास्पदरीत्या दोन स्कॉर्पिओ वाहने जात असल्याचे दिसताच त्यांना थांबवून तपासणी करण्यात आली. त्यावेळी दोन्ही गाड्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर गांजा असल्याचे उघड झाले.

पोलिसांनी ५३ किलो गांजा आणि दोन स्कॉर्पिओ वाहने जप्त केली असून, गांजा वाहतूक करणाऱ्या सहा जणांना ताब्यात घेतले आहे. पुढील तपास सुरू आहे.०

छत्रपतींच्या अतुलनीय शौर्यासमोर जग नतमस्तक–आमदार डॉ.रत्नाकर गुट्टे

गंगाखेड । प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराज हे फक्त महाराष्ट्राचे नव्हे, तर संपूर्ण देशाचे राजे होते. त्यांचे अतुलनीय शौर्य आणि दूरदृष्टी पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायी राहील, असे गौरवोद्गार आमदार डॉ. रत्नाकर गुट्टे यांनी काढले. छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समितीस त्यांनी १० लाख रुपयांचा निधी जाहीर केला. छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारणीसाठी समितीच्या वतीने घेतलेल्या पुढाकाराचे कौतुक करत आमदार गुट्टे म्हणाले, हा पुतळा पुढील अनेक पिढ्यांना छत्रपतींच्या असामान्य पराक्रमाची आठवण करून देत राहील.



याप्रसंगी माजी जिल्हा परिषद सदस्य रत्नाकर शिंदे (मालक), मित्रमंडळाचे जिल्हाध्यक्ष संदीप आळनुरे, गिरीश सोळंके, राजेश दामा, माजी नगरसेवक सत्यपाल साळवे, माजी नगरसेवक कलीम शेख, संदीप राठोड यांच्यासह छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समितीचे सदस्य आणि मोठ्या संख्येने शिवभक्त उपस्थित होते.

सातारा जिल्हा परिषद् नोकरी फसवणूक प्रकरण: वकीलासह दोघांवर गुन्हा दाखल

सातारा । प्रतिनिधी

जिल्हा परिषदेत नोकरी लावण्याचे आमिष दाखवून ९ जणांकडून सव्वा पाच लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी साताऱ्यातील एका वकीलासह त्याच्या साथीदारावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तय्यब आलमगीर मुल्ला (वय ५४, रा. संगमनगर, सातारा) आणि रमेश माने (वय ३२, रा. कठापुर, ता. कोरेगाव) अशी आरोपींची नावे आहेत.

या प्रकरणी सुनील नारायण मोरे (वय ५०, रा. करंजे पेठ, सातारा) यांनी सातारा शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

तक्रारदार मोरे यांचा मुलगा पदवीधर झाल्यानंतर नोकरीच्या शोधात होता. याचदरम्यान, वकील तय्यब मुल्ला यांनी जिल्हा परिषदेत ओळखीच्या अधिकाऱ्यांमार्फत नोकरी मिळवून देण्याचे आश्वासन दिले. एका जागेसाठी ५५,००० रुपये घेतले जातील, असे सांगून मुल्ला यांनी तक्रारदारांची ओळख आशिष माने यांच्याशी करून दिली. त्यानंतर तक्रारदाराने ऑनलाइन पैसे पाठवले.तक्रारदारांप्रमाणेच अन्य आठ जणांकडूनही पैसे उकळण्यात आले. या प्रकरणात संकेत मोरे (९०,०००), धनंजय मोरे (५५,०००), विनोद फाळके (५५,०००), प्रतीक दुदुसकर (५५,०००), सचिन वाघमळे (५५,०००), श्रीकृष्ण दुदुसकर (५५,०००), प्रविण वाघमळे (५५,०००) आणि शीतल वाघमळे (५५,०००) यांनी पैसे दिले होते.आरोपींनी नियुक्ती पत्रेही दिली, मात्र प्रत्यक्षात कोणालाही नोकरी मिळाली नाही. पैसे परत मागितल्यावर संशयितांनी खंडणीचा गुन्हा दाखल करण्याची धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद आहे. फसवणुकीचा प्रकार लक्षात आल्यानंतर तक्रारदाराने पोलिस ठाण्यात धाव घेतली. पोलिसांनी दोघांविरोधात गुन्हा दाखल केला असून, एकाला अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

छत्रपती संभाजी महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या पहिल्या टप्प्याच्या कामांची जिल्हाधिकाऱ्यांकडून पाहणी

सातारा । प्रतिनिधी

छत्रपती संभाजी महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या पहिल्या टप्प्यातील कामांची सातारा जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी पाहणी केली. हे काम पूर्ण झाले असून, त्यांनी महाविद्यालय, वसतीगृह, इमारत, किचन आणि निवासस्थानांची तपासणी केली.

यावेळी जिल्हाधिकारी संतोष पाटील म्हणाले, या वैद्यकीय महाविद्यालयात १०० विद्यार्थ्यांची क्षमता असून, ५०० खाटांचे रुग्णालय उभारण्यात येत आहे. या ठिकाणी तयार होणाऱ्या तज्ज्ञ डॉक्टरांमुळे जिल्ह्यातील गरजू आणि गरीब



रुग्णांना दर्जेदार आरोग्यसेवा मिळेल.

महाविद्यालयाच्या उर्वरित कामांना वेग देण्याच्या सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. तसेच दुसऱ्या आणि तिसऱ्या टप्प्यातील कामे लवकर पूर्ण करण्याचा आदेश दिला. त्यांनी आतापर्यंत शासनाने दिलेल्या निधीची आणि खर्चाच्या विवरणाचीही माहिती घेतली.

बांधकामास कोणतीही अडचण आल्यास थेट संपर्क साधावा, असेही त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना सांगितले.यावेळी वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. रविंद्रनाथ चव्हाण, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. युवराज करपे आणि कार्यकारी अधिकारी श्रीपाद जाधव उपस्थित होते.

देवनिल विद्यालय टेकाडी येथे जिल्हास्तरीय लोकनृत्य लावणी स्पर्धा संपन्न

मुल । प्रतिनिधी

देवनिल विद्यालय टेकाडी येथे विद्यासागर शिक्षण प्रसारक मंडळ, मुल यांच्या वतीने स्व. निलिमाताई भांडेकर यांच्या चौदाव्या स्मृतिदिनानिमित्त जिल्हास्तरीय लोकनृत्य लावणी स्पर्धा आयोजित करण्यात आली. या स्पर्धेचा विषय महाराष्ट्राची संस्कृती जोपासणारा लोकनृत्य लावणी होता.

स्पर्धेत प्राथमिक गटात गुंजन धिरज चौधरी, स्वरा भोजराज मुनघाटे, आणि रुबीना परशुराम मानकर यांनी क्रमशः प्रथम, द्वितीय, आणि तृतीय पुरस्कार प्राप्त केले. तसेच, माध्यमिक गटात सानिया देवाजी बावणे, खुशी पत्रुजी सोनुले, आणि उन्नती माणिक उंदीरवाडे यांनीही प्रबळ स्पर्धेत विजेतेपद मिळवले.

तसेच, माध्यमिक शालांत परीक्षा २०२४ मधील गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला, ज्यात गुंजन कैलास अलोने, श्रुतिका अशोक आवळे, आणि दिक्षा



हितेश जेंगठे यांचा समावेश होता.

कार्यक्रमाच्या समारोपासाठी माजी आमदार देवरावजी भांडेकर आणि डॉ. महेश भांडेकर उपस्थित होते, आणि कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील शिक्षक तसेच अनेक विद्यार्थी सहकार्य करीत होते.

संस्थाचालक दर्शन अग्रवाल यास अटक करा म्हणुन ग्रामस्थ व पालक रस्त्यावर ; दोन तास चक्का जाम

पळशी फाटा येथे रास्ता रोको अंदोलन : हजारो च्या संख्येने उपस्थीत : वाहनाची गर्दी

महिलांचा रास्तारोको मध्ये टाहो;आमच्या महीमाच्या मृत्यूस जबाबदार असणाऱ्या सर्वच संचालकांना अटक करा

उमरखेड । प्रतिनिधी

तालुक्यातील दिवटपिंपरी येथील शाळकरी बालीका कु महीमा आप्पाराव सरकाटे या मुलींचा स्कुलबसच्या अपघातात मृत्यू २ ५ जानेवारी रोजी झाला ., मालवाहतूक गाडीचे स्कूल बस मध्ये रूपांतर करून संस्थाचालक दर्शन अग्रवाल यांनी करून विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळ केला यार्चीस्कुल बस चा पळशी फाटया जवळील लिंबाच्या झाडाला धडक देऊन अपघात झाला त्यामध्ये कु . महीमाचा मृत्यू झाला तर वीस ते पंचवीस विद्यार्थी जखमी झाले या घटनेला जबाबदार संस्थाचालक दर्शन अग्रवाल आहे ड्रायव्हर वर गुन्हा दाखल झाला संस्था चालक दर्शन अग्रवाल व मुख्याध्यापक माधव कदम यांच्यावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल होवून आठ दिवस झाले तरी पोलीस प्रशासनने त्यांना अद्याप अटक केली नाही . तसेच आरटीओच्या अहवालानुसार त्या स्कूलबस चे कुठल्याही इन्शुरन्स फिटनेस प्रमाणपत्र, पियुसी नव्हते . पालकांनी व विद्यार्थ्यांनी वेळोवेळी दर्शन अग्रवाल यांना पालक सभेमध्ये तोंडी याची सूचना देऊनही संस्थाचालक दर्शन अग्रवाल यांनी कुठलीही दखल न घेतल्यामुळे हा भीषण अपघात झाल्यामुळे तेव्हा संस्था संचालक जबाबदार आहे असा पालकांचा आरोप आहे त्या निषेधार्थ पळशी फाटा येथे दि १ फेब्रूवारी ला दुपारी १२ वाजता आंदोलन केले पळशी फाटा येथे दोन तास ट्रॉपीक जाम होती उमरखेड – पूसद राज्य मार्ग रस्ता दोन तास चक्का जाम केला चक्का जाम मध्ये महिला पुरुष ग्रामस्थ व पालक इतर गावचे मंडळी होती पोलीस प्रशासनाला मागणी केली की संस्थाचालक दर्शन अग्रवाल यास अटक करा म्हणून भर उन्हात रस्त्यावर महिला व पुरुष आले होते दर्शन अग्रवाल यास अटक का करत नाही? म्हणुन महिलांनी तळ ठोकुण बसल्या होत्या . रास्ता रोको आंदोलनातील प्रमुख मागण्या कु महीमा आप्पाराव सरकाटे या मुलीच्या कुटुंबाला न्याय दयावा . व संस्थाचालक दर्शन अग्रवालला तात्काळ अटक करा स्टूडंट वेल्फेअर इंग्लीस मिडीअम स्कुलची मान्यता रद्द करा मृतक महीमा च्या कुटंबाला संस्थाचालकाकडून एक कोटी रुपये मदत दयावी . तपास अधिकारी बदलून दयावा या मागण्या संदर्भात रास्ता रोको करण्यात आला . भर उन्हात महिलांनी आक्रमता दाखविली जोपर्यत आरोपी दर्शन अग्रवाल यास अटक होत नाही तो पर्यंत आम्ही जाग्यावरून हालणार नाही असा दम पोलीस प्रशासनाला दिला . रास्ता रोको करण्यासाठी पिंपरी दिवट,, पोफाळी,कळमुला, पळशी,नागापूर,मुळावा,, जनुना येथील हजारो ग्रामस्थ



महिला पुरुष उपस्थीत होते दिवटपिंपरी येथील शेकडो महिलांनी पोलीस प्रशासनाचा निषेध केला आरोपी दर्शन अग्रवाल यास अटक का करत नाही असा प्रश्न महिला पोलीसांना विचारला पण पोलीस प्रशासन हैराण झाले त्यावेळी त्यांनी वेळ मागीतला तर दोन – तीन दिवसात अटक करून असे आश्वासन दिले , त्यानंतर रास्ता रोको स्थगीती करण्यात आला पालकांनी पोलीस प्रशासनावर विश्वास ठेवला मंगळवारपर्यंत आरोपीस अटक जर झाली नाहीतर बेमुदत रास्ता रोको करू असा इशारा ग्रामस्थानी दिला . आंदोलनात पोलीसानी कडक बंदोबस्त ठेवला कोणताही अनुसुचीत प्रकार घडला नाही.

मृत्यूक मुलीची काक रस्त्यावर हंबरडा फोडून रडल्याने अशृंच्या धारा डोळ्यातून पडत होत्या , त्यावेळी सर्वांच्या भावना दु:खावल्या होत्या . कु महीमा ची काकु बोलत होती नवस करून तेरा वर्षानी महीमा आमच्या घरात जन्माला आली आणि तिचा शाळा संचालकाने बळी घेतला .

कायद्यानुसार आरोपीस अटक करू पोलीसाला वेळ दयावा आरोपीचा शोध घेत आहे घटणा दुदैवी झाली आम्ही पोलीस प्रशासन मृत्यूक मुलीच्या कुटुंबीयांना न्याय देण्यासाठी प्रयत्न करत आहे
हनुमंत गायकवाड पोलीस उपविभागीय अधिकारी

रास्ता रोको आंदोलणात शिवसेना (शिंन्दे) गट सामील होवून आरोपीस अटक करा म्हणुन त्यांनी सुद्धा निवेदन दिले . शिंन्दे गटाचे सैनिक पळशी फाटा येथे रास्ता रोको आंदोलन सहभागी होते चिंतागराव कदम, सविता कदम,ड संजय जाधव, कैलास कदम, रवि रुडे, राजू गायकवाड यांनी सहभाग घेतला .

भद्रावती येथे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचा रजत महोत्सव व पदाधिकारी मेळावा

भद्रावती । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या रजत महोत्सव समारंभ व पदाधिकारी मेळाव्याचे दि. ३ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता स्थानिक स्वागत सेलिब्रेशन सभागृहात आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वणी विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार संजीवरेड्डी बोदकुलवार राहणार आहेत. कार्यक्रमाचे उद्घाटक महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष गोविंद वाकडे राहणार आहेत. सत्कारमूर्ती म्हणून वरोरा–भद्रावती विधानसभा मतदारसंघाचे आमदार करण देवतळे राहणार आहेत. तसेच महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य कार्याध्यक्ष निलेश सोमानी हे मुख्य अतिथी राहणार आहेत.

याप्रसंगी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष प्रा. महेश पानसे यांच्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन






सोहळा पार पडणार आहे.कार्यक्रमाचे विशेष अतिथी म्हणून एन.आय.टी.नागपूरचे अतिरिक्त जिल्हाधिकारी अविनाश कातडे, वनप्रकल्प विभाग चंद्रपूरचे सहव्यवस्थापक स्वप्निल मरस्कोल्हे, तर कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून भद्रावतीचे तहसीलदार राजेश भांडारकर, पंचायत समितीचे संवर्ग विकास अधिकारी आशुतोष सपकाळ, पोलिस निरीक्षक अमोल काचोरे, महा.प्रांतिक तैलिक महासंघाचे प्रदेश उपाध्यक्ष प्रकाश देवतळे, माजी नगराध्यक्ष अनिल धानोरकर, वरोरा न.प.चे माजी नगराध्यक्ष अहेतेश्याम अली, मानवाधिकार साहाय्यता संस्थानचे चंद्रपूर जिल्हा प्रमुख विनायक गरमडे, दैनिक महासागरचे जिल्हा संपादक प्रवीण बतकी, प्रा.ड.नाहिद हुसेन, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे विदर्भ उपाध्यक्ष अनुपकुमार भार्गव आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई रजत महोत्सव समारंभ व पदाधिकारी मेळाव्याला राज्यातील, विदर्भातील सर्व पदाधिकारी, सदस्यगण व पत्रकार बंधुंना आंमत्रित करण्यात आले आहे. याप्रसंगी पत्रकार संघाच्या पदाधिकाऱ्यांना संघटन कौशल्य सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे. या भव्य सोहळ्यात राज्यातील, विदर्भातील, जिल्ह्यातील, तालुक्यातील सर्व पदाधिकारी, सदस्यगण व पत्रकार बंधूंना उपस्थित राहण्याचे आवाहन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या भद्रावती तालुका शाखेचे अध्यक्ष शाम चटपल्लीवार तसेच सर्व पदाधिकाऱ्यांनी व सदस्यांनी केले आहे.

आदरणीय शंकर मामा साबळे यांच्या निधनाने सर्वसामान्यांची माया हरपली

जामखेड । प्रतिनिधी

जामखेड तालुक्यातील नान्नज येथील रहिवासी आणि अहिल्यानगर जिल्ह्याचे माजी जिल्हा परिषद अध्यक्ष स्व. बाबासाहेब निवृत्ती पवार (पाटील) यांचे विश्वासू सहकारी म्हणून परिचित शंकर बाबुराव साबळे (वय ८९) यांचे २७ जानेवारी रोजी पहाटे २ वाजता अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने सर्वसामान्यांची माया हरपल्याची भावना ग्रामस्थ व्यक्त करत आहेत. शंकर मामा साबळे हे नान्नज विविध कार्यकारी सेवा सहकारी विकास सेवा सोसायटीत सलग २५ वर्षे धान्य वाटप सेवक म्हणून कार्यरत होते. त्यांनी अल्पशा वेतनातही गरीब आणि गरजूंची सेवा केली. समाजातील सर्व जातिधर्मांतील लोकांशी आपली नाळ जोडून, माणुसकीच्या नात्याने सर्वसामान्यांसाठी कार्यरत राहिले. त्यांच्या निधनाने गावाने एक निष्ठावान आणि सेवाभावी व्यक्तिमत्त्व गमावले आहे.



शंकर मामा साबळे यांच्या पार्थिवावर नान्नज येथील गुरेवाडी रोड स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यावेळी अनेक आप्त, मित्रपरिवार व ग्रामस्थांनी उपस्थित राहून श्रद्धांजली अर्पण केला.


त्यांच्या पश्चात पत्नी सोजरबाई, मुलगा विजय साबळे, सून माया साबळे, नातू वैभव साबळे, सार्थक साबळे, नातसून सानिका साबळे आणि लहान पंतु असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनाने संपूर्ण कुटुंब आणि गावावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

शंकर मामा साबळे यांचा दशक्रिया विधी नान्नज (ता. जामखेड) येथील गुरेवाडी रोड स्मशानभूमी जवळील नदी पात्रात सकाळी १० वाजता होणार आहे.

पारनेर महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा

पारनेर । प्रतिनिधी

न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर यांना उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करिअर कट्टा उपक्रमांतर्गत उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार जाहीर झाला आहे.



करिअर कट्टा हा उपक्रम महाविद्यालयीन स्तरावर राबविण्यात येतो. या अंतर्गत राज्यस्तरीय महाविद्यालयीन स्पर्धांचे यशस्वी आयोजन पारनेर महाविद्यालयाने केले. त्याचबरोबर, स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रशासकीय सेवेत कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनपर व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांना आवश्यक पुस्तके आणि स्वतंत्र अभ्यासिका महाविद्यालयाने उपलब्ध करून दिली आहे. या सर्व उपक्रमांचा सकारात्मक परिणाम लक्षात घेऊन प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर यांना महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार प्रदान करण्यात आला. तसेच, सिने कलावंत निर्मिती सावंत आणि मकरंद अनासपुरे यांच्या हस्ते इंदिरा युथ लिडरशीप पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

याशिवाय, स्वीप कार्यक्रमांतर्गत महाविद्यालयात मतदार जागृतीसाठी विविध उपक्रम राबविले गेले. त्याबद्दल अहिल्यानगर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ आणि जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला यांच्या हस्ते मतदान जनजागृती पुरस्कार देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले.

डॉ. मतकर यांच्या या उल्लेखनीय कार्याबद्दल अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, सचिव ड. विश्वासराव आठरे पाटील, सहसचिव जयंत वाघ, खजिनदार ड. दिपलक्ष्मी म्हसे, तसेच संस्थेचे सर्व विश्वस्त, गव्हर्निंग कौन्सिलचे सदस्य, उपप्राचार्य डॉ. तुकाराम थोपटे, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

मला मिळालेले हे पुरस्कार संस्थेच्या पाठिंब्यामुळे आणि संचालकांच्या मार्गदर्शनामुळेच शक्य झाले आहेत. महाविद्यालयात राबवलेल्या विविध उपक्रमांची दखल घेतली जात आहे, हे पाहून समाधान वाटते. या पुरस्कारांमध्ये प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि विद्यार्थ्यांचे मोलाचे योगदान आहे.
–डॉ. लक्ष्मणराव मतकर

बदलापूरमध्ये जानेवारीच्या अखेरीसच पाणीटंचाई सुरू;एप्रिल–मे मध्ये परिस्थिती गंभीर होण्याची शक्यता

बदलापूर । प्रतिनिधी

झपाट्याने विस्तारत असलेल्या बदलापूरमध्ये पाणीटंचाईने डोके वर काढले असून जानेवारीच्या अखेरीसच काही भागांमध्ये कमी दाबाने पाणीपुरवठा होण्याची तसेच पाणी खंडित होण्याची समस्या निर्माण झाली आहे. सोनीवली, यादव नगर, स्वाभिमान चाळ आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाच्या मागील परिसरातील नागरिक या समस्येने त्रस्त झाले आहेत.

नागरिकांनी आपली समस्या हेमंत चतुरे आणि मयूर मेहेर यांच्यासमोर मांडली. नागरिकांच्या मागणीनुसार चतुरे आणि मेहेर यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या (मजीप्रा) कार्यालयात भेट घेतली आणि अधिकारी माधुरी पाटील यांना निवेदन दिले. अधिकाऱ्यांनी त्वरित कारवाई करण्याचे आश्वासन नागरिकांना दिले आहे. या वेळी



परिसरातील महिलांनी चतुरे आणि मेहेर यांचे आभार मानले.

बदलापूरला बारवी धरणाचा जलसाठा लाभत असूनही पाणीटंचाईची समस्या सुटत नाही, याबाबत नागरिकांमध्ये नाराजी आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे मूलभूत सुविधांचा प्रश्न गंभीर बनत आहे. काही दिवसांपूर्वी शिरगावातही भीषण पाणीटंचाई जाणवली होती, त्यावर नागरिकांनी शहरप्रमुख वामन म्हात्रे यांच्याकडे तक्रार केली होती. जानेवारीतच पाणीपुरवठा विस्कळीत होत असेल, तर एप्रिल–मे महिन्यात परिस्थिती आणखी गंभीर होण्याची भीती नागरिक व्यक्त करत आहेत. नगरपालिकेने वेळीच उपाययोजना कराव्यात, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा नागरिकांनी दिला आहे.

सलग चौथ्या दिवशीही कारवाई सुरूच; पूर्वेतील कारवाईनंतर पश्चिमेतही धडक कारवाई

बदलापूर । प्रतिनिधी

कुळगाव–बदलापूर नगरपालिकेच्या मुख्याधिकारी मारूती गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली अतिक्रमण हटाव मोहिम गुरुवारीही सुरूच राहिली. पूर्व भागातील घोरपडे चौक, कात्रप चौक, जुना पेट्रोल पंप चौक आणि अंबरनाथ रस्त्यानंतर आता बदलापूर पश्चिमेतील रेल्वे स्थानक परिसर, खाऊ गल्ली आणि बाजारपेठेतही मोठी कारवाई करण्यात आली. टपऱ्या, हातगाड्यांसह रस्त्यात अडथळा निर्माण करणारा राडारोडा पालिकेने हटवला. त्यामुळे स्थानक परिसर मोकळा झाल्याचे दिसत आहे.

गेल्या काही महिन्यांत शहरातील रस्त्यांवर अतिक्रमण मोठ्या प्रमाणात वाढले होते. पदपथांवर दुकानदारांनी साहित्य ठेवून जागा व्यापली होती, तर काहींनी लोखंडी जाळ्या आणि सिमेंटचे ठोकळे ठेवून रस्त्यांचा काही भाग अडवला होता. परिणामी, त्याच भागात फेरिवाले बस्तान मांडू लागले, ज्यामुळे रेल्वे स्थानक परिसरात






संध्याकाळी मोठी वाहतूक कोंडी होत होती. नागरिकांनी वारंवार तक्रारी केल्यानंतर अखेर पालिकेने धडक कारवाईला सुरुवात केली.

बुधवारी सकाळपासून मुख्याधिकारी मारूती गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमणविरोधी पथकाने स्थानक परिसरात जोरदार कारवाई केली. पदपथ आणि रस्त्यावर बेकायदा उभ्या केलेल्या हातगाड्या, दुकाने आणि लोखंडी जाळ्या हटवण्यात आल्या. खाऊ गल्ली, वैशाली सिनेमा परिसर, बाजारपेठ आणि हेंद्रेपाडा येथे अतिक्रमण हटवण्याची मोहीम राबवण्यात आली. अतिक्रमण हटवण्याची ही मोहीम केवळ बाजारपेठापुरती मर्यादित न ठेवता, अयोध्या नगरीजवळील मोकळ्या मैदानात झालेले अतिक्रमणही पालिकेने हटवले. त्यामुळे शहरातील रहिवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे.

बदलापूर शहरातील वाढत्या अतिक्रमणावर वेळोवेळी कारवाई व्हावी, अशी नागरिकांची मागणी होती. अखेर सातत्याने सुरू असलेल्या मोहिमेमुळे नागरिक समाधान व्यक्त करत आहेत. भविष्यातही ही कारवाई असाच सुरू राहावी, अशी स्थानिकांची अपेक्षा आहे.

देशाच्या प्रगतीत भर घालणारा अर्थसंकल्प–बिपीनदादा कोल्हे



कोपरगां । प्रशांत टेके

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारत देशाला आत्मनिर्भर बनविण्यांसाठी ज्या ज्या योजना आणल्या त्याची जनमानसात अंमलबजावणी होत आहे. येणा–या पुढच्या पिढयांसाठी जो अर्थसंकल्प सादर केला तो देशाच्या प्रगतीत भर घालणारा असुन शेतकरी घटकांसाठी पंतप्रधान धनधान्य योजना सुरू करून आणखी एक नवे पाउल उचलले असल्याचे प्रतिपादन संजीवनी उद्योग समुहाचे अध्यक्ष बिपीनदादा कोल्हे यांनी केले.

ते पुढे म्हणांले की केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारामन यांनी सलग आठव्यांदा अर्थसंकल्प सादर करत भारत देशाच्या विकासात भर घालणा–या नवनविन योजना सुरू करून नोकरदार मध्यमवर्गीयांना आयकरात मोठा दिलासा दिला आहे. तेलबिया उत्पादन वाढविण्यांसाठी आजवर जे प्रयत्न झाले त्याच धर्तीवर डाळींमध्ये भारत देशाला स्वयंपुर्ण बनविण्यासाठी नवे धोरण आखण्यांत आले आहे. विकसीत देशात इलेक्ट्रीक उत्पादनांवर भर आहे, विकसनशील देशही यात पुढे यावे म्हणून इलेक्ट्रीक कार उत्पादन आणि उद्योगवाढीसाठी अर्थसंकल्पातुन ठोस उपाययोजना होत असल्याचे चित्र आहे.रस्ते, रेल्वे हे विकासाचे मार्ग असुन त्याच्या पायाभूत सुविधांवर भर देत चांगली तरतुद करण्यांत आली आहे. पंतप्रधान धनधान्य कृषी योजनेतुन प्रत्येक राज्याच्या सहभागावर विशेष लक्ष देण्यांत आले आहे. कॅन्सर उपचारावरील औषधोपचारात मोठी सवलत देवुन रूग्णांना दिलासा दिला आहे. वाढत्या लोकसंख्येमागे सध्या डॉक्टरांचे प्रमाण कमी असुन त्यासाठी आणखी १० हजार वैद्यकीय प्रवेशाच्या जागा वाढविण्यांवर पंतप्रधान मोदींचा भर आहे.डिजीटल भारत या संकल्पनेत आपल्या देशाबरोबरच येथील तंत्रज्ञान क्षेत्रात काम करणा–या विद्यार्थ्यांना पुढे घेवुन जाण्यासाठी तीन एआर सेंटरला मंजुरी देण्यांत आली हे नवे पाउल उचलत विकसीत देशाबरोबर आपल्या देशाला आणखी प्रगत केले जात आहे. स्टार्टअपसाठी आणखी १० हजार कोटींचा वित्तपुरवठा वाढविण्यांत आला आहे. पर्यटनांतुन शाश्वत रोजगार निर्मीती व्हावी त्याचबरोबरच भारत खेळणी उद्योगात पुढे जावा म्हणून यावरही विशेष लक्ष दिले आहे. त्यामुळे यंदाचा अर्थसंकल्प भारत देशाची अर्थव्यवस्था व ग्रामिण भाग आणखी मजबुत करणारा आहे. जगाने कोरोना सारखे संकट पाहिले त्यातही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या देशाची जगात ओळख निर्माण केली, गरीबांसह उच्च वर्गातील जनतेला यात मोठा दिलासा दिला आहे. शेती, उत्पादन, विद्यार्थी, तंत्रज्ञान, रोजगार, सुक्ष्म मध्यम उद्योग, संशोधन, आरोग्य, सुधारणा, अर्थ बळकटीकरण, महिला, युवक आदि सर्वच क्षेत्रासाठी हा अर्थसंकल्प दिशादर्शक असल्याचे बिपीनदादा कोल्हे शेवटी म्हणाले.

संत तुकाराम विद्यालयात विज्ञान शाखे साठी नवीन वर्ग खोल्यांचे भूमिपूजन


ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी विज्ञान शाखेचे नवे दार खुले

गंगापूर । प्रतिनिधी

गंगापूर तालुक्यातील शिंगी येथील पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेच्या संत तुकाराम माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात विज्ञान शाखेसाठी नव्या वर्ग खोल्यांच्या बांधकामाचे भूमिपूजन मोठ्या उत्साहात पार पडले. संस्थेचे कोषाध्यक्ष व शाळेचे पालक विवेकजी हंबर्डे (काका) व सौ. प्रज्ञाताई हंबर्डे (काकू) यांच्या हस्ते हा सोहळा संपन्न झाला.

येणाऱ्या २०२५–२६ शैक्षणिक वर्षापासून अकरावी विज्ञान शाखेसाठी शासनाने मान्यता दिली आहे. त्यामुळे इयत्ता अकरावी व बारावी विज्ञान शाखेसाठी नवीन तीन वर्ग खोल्यांचे बांधकाम हाती घेण्यात आले आहे.

या प्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष देवजीभाई पटेल, सचिव निवृत्ती (जिजा) गावंडे, तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे गंगापूर संघचालक किशोर कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती.



भूमिपूजन कार्यक्रमास शालेय समिती अध्यक्ष डिगंबर पाटील वाखुरे, बाबुलाल शेख, हरिभाऊ पाटील तिखे, महाराष्ट्र भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे अध्यक्ष संजय पाटील तिखे, बाबा शेख, इंद्रजित कासार, शंकरदेव गवारे, राजू नरोडे (बांधकाम कंत्राटदार) उपस्थित होते. तसेच शाळेचे मुख्याध्यापक प्रमोद सोनवणे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण विज्ञान शिक्षण मिळावे आणि त्यांना नव्या शैक्षणिक संधी उपलब्ध व्हाव्यात, यासाठी शाळेच्या विज्ञान शाखेचा विस्तार महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

मोफत शिक्षणासाठी विनोबा भावे यांच्या गागोदे गावामध्ये सत्याग्रह

रायगड । प्रतिनिधी

विनोबा भावे यांच्या गागोदे गावामध्ये मोफत शिक्षण हक्कासाठी सत्याग्रहाला सुरुवात झाली आहे. सत्यशोधक सर्वोदय संघटनेच्या माध्यमातून हा सत्याग्रह सुरू करण्यात आला आहे. भूदान चळवळीचे प्रेरणास्त्रोत आचार्य विनोबा भावे यांच्या जन्मगावी गावकऱ्यांनी सत्याग्रह सुरू केला असून, विनोबांच्या स्मारकात हा सत्याग्रह सुरू करण्यात आले आहे.



सत्याग्रहामध्ये विद्यार्थ्यांना पदवीपर्यंत मोफत शिक्षण मिळावे, जिल्हा परिषद व नगरपरिषदांमधील शालेय शिक्षणाचा दर्जा वाढवावा, कंत्राटी शिक्षक पद्धती बंद करून कायमस्वरूपी शिक्षकांची नेमणूक करावी, दत्तक शाळा धोरण रद्द करावे, पहिली ते आठवी नापास न करण्याचे धोरण रद्द करावे, सेमी इंग्लिश शाळांची संख्या वाढवावी, हंगामी स्थलांतरित पालकांच्या विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह सुरू करावे, कंत्राटी कामगार कायदा रद्द करावा, आणि रोजगार हमी योजनेचे प्रभावी अंमलबजावणी करावी अशी प्रमुख मागणी केली जात आहे.

संदीप परशुराम पाटील यांच्या नेतृत्वाखाली हे सत्याग्रह आंदोलन सुरू करण्यात आले आहे. पाटील यांनी म्हटले की, सर्वांना चांगले आणि मोफत शिक्षण मिळावे ही काळाची गरज आहे. खाजगी शाळांची फी सामान्य माणसांना परवडत नाही, ज्यामुळे अनेक विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहतात. यामुळे देशभरात पहिली ते पदव्युत्तर पदवी पर्यंत शिक्षण मोफत दिले जावे अशी मागणी केली जात आहे. गावकऱ्यांसह अनेकजण या सत्याग्रह आंदोलनात सहभागी झाले आहेत.

शिवप्रसाद अहिलाजी पा.डमाळे यांची राज्यस्तरीय कृषी भूषण पुरस्कारासाठी निवड

वैजापूर । प्रतिनिधी

शेतीमध्ये खते व औषधींच्या वापरामुळे जमिनीची अपरिमित हानी होत आहे. याचा परिणाम मानवी आरोग्यावरही मोठ्या प्रमाणात होत असून, विविध आजारांना आमंत्रण दिले जात आहे. भविष्यात ही हानी रोखण्यासाठी, तसेच जमिनीचा पोत सुधारण्यासाठी ग्रामीण भागात कृषी सल्लागार महत्त्वाचा घटक बनत आहेत.



शेतकऱ्यांना जैविक शेतीकडे वळवण्यासाठी वैजापूर तालुक्यातील शिवप्रसाद अहिलाजी पा. डमाळे यांनी केलेले उल्लेखनीय कार्य आता राज्यस्तरीय दखल घेण्यात आले आहे. त्यांच्या कार्यामुळे राज्यात युवकांना जैविक शेतीचे महत्त्व कळविण्यात मोठा ठसा बसला आहे. याच कार्याची दखल घेऊन पत्रकार सेवा संघातर्फे शिवप्रसाद अहिलाजी पा. डमाळे यांची कृषी भूषण शेती पुरस्कार साठी निवड करण्यात आली आहे. त्यांना हा मानाचा पुरस्कार मिळाल्याबद्दल शेतकरी समुदायामध्ये आनंद व्यक्त केला जात आहे.

सर्वसामान्य व शेतकरी वर्गासाठी लाभाचे अर्थसंकल्प–आशु गोंडाणे

भंडारा । प्रतिनिधी

केंद्र सरकार द्वारे आज घोषित केलेल्या अर्थसंकल्पामध्ये घेण्यात आलेले निर्णय हे सर्वसामान्य व शेतकरी वर्गासाठी अंत्यंत फायद्याचे असल्याचे निदर्शनास येते. केंद्र सरकारने कॅन्सरवरील औषधांना कस्टम ड्युटीतून वगळून तसेच दुर्धर आजारांसाठी ३६ नव्या औषधांच्या सीमाशुल्क मुक्त आजाराच्या बाबतीत सर्वसामान्यांसाठी मोठा निर्णय घेतलेला आहे.



पंतप्रधान धन धान्य योजने अंतर्गत डाळ उत्पादनावर भर देऊन तसेच किसान क्रेडिट कार्ड वरील कर्जाची मर्यादा ३ लाखांवरून ५ लाखांपर्यंत वाढवून व लघु उद्योगांसाठी विशेष क्रेडिट योजना सरकारने जाहीर करून शेतकरी वर्गासाठी आशेचे नवीन किरण या अर्थसंकल्पाद्वारे केंद्र सरकारने दाखविले आहे. शहरी भागातील प्रधानमंत्री स्वनिधी योजनेची मर्यादा वाढवून ३०,००० /– करण्यात आली असल्याने छोटे व्यवसायिक यांना दिलासा दिला आहे तसेच गिग वर्कर यांना सुद्धा इ–श्रम पोर्टल वर नोंदणी करून कामगारांचा लाभ घेता येणार आहे. एकंदर आजचे अर्थसंकल्प सर्वसमावेशक आहे.

चंद्रपूर येथे जिल्हास्तरीय पशु–पक्षी प्रदर्शनी व सरस महोत्सव

चंद्रपूर । प्रतिनिधी

जिल्हा परिषद पशुसंवर्धन विभाग व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांच्या संयुक्त विद्यमाने १ फेब्रुवारीपासून जिल्हास्तरीय पशुपक्षी प्रदर्शनी व सरस महोत्सव चांदा क्लब ग्राऊंड येथे आयोजित करण्यात आला आहे.तीन दिवसीय या पुशपक्षी प्रदर्शनीमध्ये जातीवंत गाय वर्गातील देवणी, डांगी, खिल्लार, लाल कंधारी, गवळावू, कठाणी तसेच भारतीय गोवंशाच्या गीर, थारपारकर या देशी गायी / वळू तसेच विदेशी जातीच्या संकरीत एच.एफ. व संकरीत जर्सीचे गायी / वळू, त्याचप्रमाणे म्हैस वर्गात नागपूरी, जाफ्राबादी, पंढरपुरी, मु–हा जातीच्या म्हशी / रेडा, शेळी गटात तोतापारी, उस्मानाबादी, बेरारी, बिटल, काठियावाडी / कच्छी, बारबेरी, आफ्रिकन बोएर जातीच्या शेळ्या / बोकड, मेंढी गटात दख्खनी मेंढी, कुक्कुट व कुक्कुटादी पक्षीगटात कडकनाथ, कावेरी, सातपुडा, असील, सोनारी, गावरान जातीचे कुक्कुट पक्षी व खाकी कॅम्पबेल बदक सहभागी होणार आहेत.

केळझर येथे बंद घराची खिडकी तोडून चोरट्यांनी ३१ हजाराचा मुद्देमाल चोरून नेला

सेलू पोलिसांत गुन्हा नोंद

सिंदी (रेल्वे) । प्रतिनिधी

घरी कोणीही नसल्याची संधी साधून अज्ञात चोरट्याने खिडकी तोडून घरात प्रवेश करीत ३१ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. ही घटना तालुक्यातील केळझर येथील १ फेब्रुवारी, शनिवार सकाळी ९ वाजता उघडकीस आली. याप्रकरणी सकाळी ११.३० वाजता सेलू पोलिसांनी गुन्हा नोंदवला, अशी माहिती मिळाली आहे.

केळझर येथील रमेश सदाशिव पिस्तुलकर हे पत्नीसह केजाजी महाराजांच्या पुण्यतिथी उत्सवाला घोराड येथे गेले होते आणि रात्रभर सेलू येथे मुलीच्या घरी मुक्काम केला. दरम्यान, मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी घराच्या मागील खिडकी तोडून घरात प्रवेश केला. चोरट्यांनी घरातील कपाटात ठेवलेले दोन सोन्याच्या अंगठ्या व चांदीचा करंडा असा ३१ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. सकाळी घरी परत आल्यावर चोरीचे कृत्य उघडकीस आले. मात्र, कपाटाच्या दुसऱ्या कप्प्यात असलेले दागिने आणि साडीच्या आतमधील ५ हजार रुपयांची रक्कम चोरट्यांच्या हाती लागली नाही.घटनेची तक्रार सेलू पोलिसांना केल्यानंतर सहाय्यक फौजदार मनोहर मुडे, निरंजन वरभे व सुरेश मडावी यांनी घटनास्थळी पोहोचून पंचनामा केला. अधिक तपास सुरू असून, पोलीस चोरीच्या गुन्ह्याचा शोध घेत आहेत. बंद घरांना टार्गेट करून चोरी केल्यामुळे गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

विश्वकर्मा सुतार लोहार समाज मंडळाच्या अध्यक्षपदी संजय काशिनाथ सोनवणे यांची बिनविरोध निवड

धुळे । प्रतिनिधी

साक्री तालुक्यातील पिंपळनेरच्या विश्वकर्मा सुतार लोहार समाज मंडळाची सर्व साधारण सभा (एकविरा माता मंदीर, श्री भगवान विश्वकर्मा मंदीर) येथे आयोजित करण्यात आली. या सभेत नव्या कार्यकारिणीची सर्व समाज बांधवांच्या संमतीने बिनविरोध निवड करण्यात आली.

संजय काशिनाथ सोनवणे यांची अध्यक्षपदी निवड करण्यात आली, तर उपाध्यक्षपदी विलास संभाजी मोरे, सचिवपदी सतीश हिराजी चव्हाण, खजिनदारपदी नितीन अशोक सूर्यवंशी यांची निवड करण्यात आली. याशिवाय सल्लागार म्हणून अरुण निकम, दगडु ओंकार मोरे, हिरालाल मोतिराम निकम, अशोक रामदास निकम, गुलाब रामकृष्ण निकम, प्रकाश शंकर मोरे, वाल्मिक बाबुराव मोरे, कैलास छगन गवळे, माधव जगन्नाथ निकम, अनिल भिकन मोरे, मुकुंद गोविंद खैरनार यांची निवड केली गेली. सभेचे अध्यक्षस्थान संजय काशिनाथ सोनवणे यांना देण्यात आले होते आणि नविन कार्यकारिणी सर्व समाज बांधवांच्या संमतीने बिनविरोध निवडली गेली.



केंद्रीय अर्थसंकल्पातून महाराष्ट्रातील पायाभूत प्रकल्पांना भरीव निधी मिळाला–आ.देवराव भोंगळे

राजुरा । प्रतिनिधी

सर्वप्रथम केंद्रीय अर्थमंत्री श्रीमती निर्मला सीतारामन यांनी केंद्रीय अर्थसंकल्पात घेतलेल्या निर्णयांचे स्वागत करतो.असून त्याबद्दल प्रधानमंत्री मा.श्री.नरेंद्रजी मोदी आणि अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचे मनापासून आभार मानतो.

बारा लाख रुपयांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त करुन मध्यमवर्गीय देशवासियांना मोठी भेट दिली आहे. ज्येष्ठ नागरिकांसाठी टीडीएस मर्यादा ५० हजारांहून १ लाख करण्याचा निर्णयही स्वागतार्ह आहे. कॅन्सरसह इतर गंभीर आजारांवरील ३६ जीवनावश्यक औषधांवरील सीमाशुल्क संपूर्णपणे माफ केल्याने जिवनावश्क औषधे स्वस्त होणार आहेत.देशातील शेतकरी, कष्टकरी, व्यापारी, उद्योजक, महिला, युवक, विद्यार्थी, सर्वसामान्य माणूस केंद्रबिंदू मानून सादर झालेल्या अर्थसंकल्पातून देशातल्या प्रत्येक व्यक्तीला विकासाची संधी, प्रत्येक समाजघटकाला बळ मिळणार आहे. देशाला आर्थिक महासत्ता आणि विकसित राष्ट्र बनण्याच्या वाटेवर नेणारा हा अर्थसंकल्प आहे. यातून महाराष्ट्राच्या पायाभूत विकासाला बळ मिळणार असून देशात तयार होणारे कपडे, चामड्याच्या वस्तू, मत्स्योत्पदनांवरील शुल्क कमी झाल्याने महाराष्ट्राला त्याचा फायदा होईल, असा विश्वास आहे.शेतकरी, महिला, युवक, गरीब वर्गासाठी विविध योजनांची घोषणा केली आहे. महिलांच्या कौशल्याविकास प्राधान्याचा विषय आहे. पंतप्रधान धनधान्य योजनेंतर्गत शेती उत्पादकता वाढ, शेतमाल साठवणूक सुविधा, सिंचन आणि क्रेडीट सुविधांवर भर देण्यात येणार असून शंभर जिल्ह्यांवर लक्ष केंद्रीत करण्यात येणार आहे. त्याचा मोठा फायदा महाराष्ट्राला होईल. कापूस आणि डाळींच्या उत्पादनवाढीसंदर्भात घेतलेले निर्णयही महाराष्ट्राच्या फायद्याचे आहेत. किसान क्रेडीट कार्डची मर्यादा ५ लाख करण्याचा निर्णय शेतकऱ्यांच्या फायद्याचा आहे. देशाला जगाचे फूड बास्केट बनवण्यात महाराष्ट्राची भूमिका प्रमुख असेल.महाराष्ट्र हे शिक्षण, उच्च आणि तंत्रशिक्षणाच्या क्षेत्रात अग्रेसर राज्य आहे. सरकारी शाळांमध्ये ५ लाख अटल टिंकरिंग लॅब स्थापन करणे, शाळा आणि आरोग्य केंद्रांना ब्रॉडबँड सेवा पुरवणं, भारतीय भाषांमध्ये पुस्तकं उपलब्ध करुन देणे, आयआयटीमधील तसेच मेडिकल कॉलेजमधील विद्यार्थी संख्या आणि सुविधा वाढवण्याचा फायदा राज्यातील युवकांना निश्चितपणे होईल. ऑनलाईन गिग वर्कर्ससाठी ओळखपत्र तयार करून त्यांना ई–श्रम पोर्टलवर नोंदणी करण्याचा निर्णय महत्वाचा असून सुमारे १ कोटी गिगवर्कर्सना पीएम जन आरोग्य योजनेअंतर्गत आरोग्य सेवा पुरवण्यात येणार आहे. हे सर्व निर्णय विद्यार्थी, युवक, समाजातील सामान्य घटकांना केंद्रस्थानी ठेवून घेण्यात आले आहेत. न्यूक्लिअर एनर्जी मिशनच्या माध्यमातून २०४७ पर्यंत १०० गिगावॅट ऊर्जानिर्मितीचे लक्ष्य देशाला महासत्तेकडे नेणारे महत्वाचे पाऊल आहे. शहरांमध्ये सुधारणा राबवण्यासाठी सरकार १ लाख कोटींचा अर्बन चॅलेंज फंड निर्माण करण्याचा निर्णयही तितकचा महत्वाचा आहे. देशात १२० ठिकाणी उडान योजना राबवण्याचा त्यातून हवाई प्रवासी संख्या ४ कोटींवर नेण्याचा संकल्प आहे. देशातील ५२ प्रमुख पर्यटन स्थळांच्या विकासाचेही धोरण आहे. ही विकसित राष्ट्रासाठीची, महासत्तेच्या वाटेवरील आधुनिक भारताच्या निर्मितीसाठीची मजबूत पायाभरणी आहे. देशाला विकसित भारत, आर्थिक महासत्ता बनवण्याच्या प्रधानमंत्री मा.श्री. नरेंद्रजी मोदी यांच्या स्वप्नपूर्तीसाठी आजचे अर्थसंकल्प रोडमॅप ठरेल. असा विश्वास वाटतो.



शालेय सांस्कृतिक कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना स्वत:ला सिद्ध करण्याची संधी–आ.जोरगेवार

विद्या विहार स्कुल येथे स्नेहमील आणि सांस्कृतीक कार्यक्रमाचे आयोजन

चंद्रपूर । प्रतिनिधी

शिक्षण ही केवळ पुस्तकांपुरती मर्यादित न राहता विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाची प्रक्रिया आहे. अशा विविध उपक्रमांमधून विद्यार्थी जीवन कौशल्ये शिकतात, संस्कार आत्मसात करतात आणि समाजातील जबाबदार नागरिक म्हणून घडतात. या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढतो, संघभावना निर्माण होते आणि त्यांना स्वतःला सिद्ध करण्याची संधी मिळते, असे प्रतिपादन आमदार किशोर जोरगेवार यांनी केले.

विद्या विहार स्कूल येथे स्नेहमीलन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाला राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर, शिक्षक विभागाचे आमदार सुधाकर अडबाले, सरदार पटेल मेमोरीअर ट्रस्ट चे अध्यक्ष विनोद तत्तात्रे, विद्या विहार स्कूल चे संचालक चंद्रा रेड्डी, शोभा रेड्डी, क्रिष्णा रेड्डी आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना आ. जोरगेवार म्हणाले की, आजच्या या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमातून त्यांची प्रतिभा आणि आत्मविश्वास स्पष्ट दिसून येतो. शाळेतील अशा उपक्रमांमुळेच विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व बहरते. त्यांच्या नृत्य, गाणे, अभिनय आणि विविध सादरीकरणांतून



त्यांनी आपली कला आणि मेहनतीचे दर्शन घडवले आहे.शिक्षक आणि पालक या दोघांची भूमिका विद्यार्थी घडवण्यात अत्यंत महत्त्वाची आहे. शिक्षक ज्ञानाचा प्रकाश देतात आणि पालक तो संस्कारात रूपांतरित करतात. विद्यार्थ्यांनीही आपले ध्येय निश्चित करून परिश्रमाने पुढे जायला हवे. शिक्षणासोबतच क्रीडा, कला आणि सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये सहभाग घेतल्यास त्यांचा सर्वांगीण विकास होतो. शिक्षण हा जीवनाचा मूलभूत आधारस्तंभ आहे आणि त्यासोबतच विद्यार्थ्यांनी कला, क्रीडा आणि सामाजिक जाणीव यामध्येही उत्तम कामगिरी करणे गरजेचे आहे, असे ते यावेळी म्हणाले या कार्यक्रमाला शिक्षक, विद्यार्थी आणि पालकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरावर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .

भंडारा जिल्हा वार्षिक योजनेच्या २३७ कोटींच्या आराखड्यास मंजुरी

पालकमंत्री संजय सावकारे यांच्या अध्यक्षतेत जिल्हा नियोजन समितीची बैठक

भंडारा । प्रतिनिधी

भंडारा जिल्ह्याच्या सन २०२५- २६ यावर्षीच्या जिल्हा वार्षिक योजनेच्या २३७ कोटीच्या प्रारूप आराखडयास आज जिल्हा नियोजन समितीने मंजूरी दिली. वस्त्रोद्योग मंत्री मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय सावकारे यांच्या अध्यक्षतेखाली आज जिल्हा नियोजन समितीची बैठक झाली.

जिल्हा नियोजन समितीची बैठक आज जिल्हा नियोजन भवन येथे पार पडली. आजच्या बैठकीला जिल्हा परिषद अध्यक्षा कविता उईके आमदार, नाना पटोले, आमदार परिणय फुके,आमदार नरेंद्र भोंडेकर,आमदार राजू कारेमोरे,आमदार अभिजीत वंजारी, जिल्हाधीकारी डॉ. संजय कोलते, मुख्य कार्यकारी अधिकारी समीर कुर्तकोटी, पोलीस अधीक्षक नुरुल हसन, आदींची उपस्थिती होती.

जिल्हा वार्षिक योजना सन २०२४-२५ अंतर्गत सर्वसाधारण योजनेकरिता रूपये २४६.०० कोटी, अनुसुचित जाती उपयोजना करिता रूपये ५३.०० कोटी व आदिवासी उपयोजना क्षेत्रबाहय या योजनांकरिता रु.१०.७६ कोटी असे एकूण रूपये ३०९.७६ कोटी नियतव्यय अर्थसंकल्पित आहे.

मंजूर असलेल्या नियतव्ययापैकी सर्वसाधारण योजनेकरिता रूपये ९८.४० कोटी, अनुसुचित जाती उपयोजना करिता रूपये १७.४९ कोटी व आदिवासी उपयोजना क्षेत्रबाहय या योजनांकरिता रूपये ४.४९ कोटी असे एकूण रु. १२०.३८ कोटी निधी अर्थसंकल्पिय वितरण प्रणाली प्राप्त झालेला आहे.२०२४-२५ च्या प्राप्त तरतुदी पैकी सर्वसाधारण योजनेअंतर्गत रूपये ७७.९५ कोटी, अनुसुचित जाती उपयोजनाअंतर्गत रु. ११.७४ कोटी व आदिवासी उपयोजना क्षेत्रबाहय या योजनाअंतर्गत रू ३.२४ कोटी असे एकूण रूपये ९२.९३ कोटी कार्यवाही यंत्रणांना वितरीत करण्यात आलेला आहे. वितरीत तरतुदी पैकी सर्वसाधारण योजनेअंतर्गत रूपये ६१.९४ कोटी, अनुसुचित जाती उपयोजनाअंतर्गत रु. १०.९१ कोटी व आदिवासी उपयोजना क्षेत्रबाहय या योजनाअंतर्गत रू२.२५ कोटी असे एकूण रूपये ७५.०९ कोटी निधी खर्च झालेला आहे. वितरीत तरतुदीशी खर्चाची टक्केवारी ८०.८१ टक्केएवढी आहे. शासनाने आर्थिक मर्यादा घालून दिली आहे. तर विविध विभागाने ६४० कोटीची मागणी केली आहे. मंत्रालय स्तरावर वित्त व नियोजन मंत्र्यांच्या मार्गदर्शनात राज्यस्तरीय बैठक होईल. त्यामध्ये शासनाने घातलेली मर्यादा व प्रत्यक्ष मागणी यावरून जिल्ह्याचा २ज२५-२६ चा नियोजनाचा आराखडा ठरणार आहे. या आराखड्यामध्ये जिल्ह्यातील यंत्रणेने प्रस्तावित केलेल्या मागणीप्रमाणे निधी मिळावा यासाठी प्रयत्न करणार असल्याचे पालकमंत्री संजय सावकारे यांनी स्पष्ट केले.



जिल्ह्याच्या २०२५ -२६च्या मर्यादेतील आराखड्यात भरीव वाढ करण्याची शिफारस राज्यस्तरीय बैठकीत करण्यात येईल, असे आश्वासन पालकमंत्र्यांनी दिले. वित्त व नियोजन मंत्र्यांच्या बैठकीमध्ये आता जिल्ह्याच्या डीपीडीसीच्या अंतिम प्रारूपाला मान्यता मिळणार आहे. तत्पूर्वी, आज पालकमंत्री महोदयांच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीमध्ये जवाहरनगर दुर्घटनेतील मृतकांना श्रध्दांजली वाहण्यात आली.विविध विषयांवर चर्चा झाली. यामध्ये प्रामुख्याने ओबीसी वस्तीगृहाचा मुददा,मत्सयबीज निर्मीतीसाठी प्रशीक्षण केंद्र उभारणे,पर्यटन स्थळांचा विकास ,जलजीवनमधील प्रलंबीत कामे,वाळु धोरणानुसार नागरिकांना किफायतीशीर दरात वाळू उपलब्ध करून देणे, आदी विषयांवर लोकप्रतिनिधींनी चर्चेत सहभाग घेतला. यासोबतच केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांबाबत व जिल्ह्यातील अंमलबजावणी बाबत यावेळी अधिकाऱ्यांसोबत उपस्थित आमदारांनी चर्चा केली.

जिल्हयातील महत्वाच्या प्रश्नाविषयी जिल्हाधिका-यांनी अधिनस्त यंत्रणांची बैठक घेऊन गतीमान पध्दतीने शंभर दिवसाचा कार्यक्रमाची अंमलबजावणी करावी, तसेच विकासकामांची वेळोवेळी माहिती स्थानिक लोकप्रतिनीधीना दयावी,याबाबतही यावेळी पालकमंत्र्यांनी निर्देशित केले.सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना सन २०२४-२५ मध्ये रु. २४६.०० कोटी नियतव्यय मंजूर असुन सन २०२५-२६ करिता शासनाने कमाल नियतव्यय मर्यादा रु. १७३.२७ कोटी कळविलेली आहे. अनुसुचित जाती उपयोजना (विघयो) सन २०२४-२५ मध्ये रु. ५३.०० कोटी नियतव्यय मंजूर असुन सन २०२५-२६ करिता शासनाने कमाल नियतव्यय मर्यादा रु. ५३.०० कोटी कळविलेली आहे. आदिवासी उपयोजना क्षेत्रबाहय (ओटीएसपी) सन २०२४-२५ मध्ये रु. १०.७६ कोटी नियतव्यय मंजूर असुन सन २०२५-२६ करिता शासनाने कमाल नियतव्यय मर्यादा रु. १०.९६ कोटी कळविलेली आहे. शासनाने ठरवून दिलेल्या मर्यादेत आराखडे तयार करण्यात आलेले आहेत. सन २०२५-२६ करीता अंमलबजावणी अधिकाऱ्यांकडून रु. ८७७.४४ कोटी ची मागणी प्राप्त झालेली आहे. शासनाने ठरवुन दिलेल्या मर्यादेत आराखडे तयार केल्यानंतर रु. ६४०.२१ कोटीची अतिरीक्त मागणी आहे. बैठकीचे प्रास्ताविक जिल्हाधिकारी डॉ.संजय कोलते यांनी केले.तर सूत्रसंचालन जिल्हा नियोजन अधिकारी संजय कडु यांनी केले.

सातारा जि.प.मध्ये नोकरीचे आमिष दाखवून फसवणूक

वकीलासह दोघांवर गुन्हा दाखल

सातारा । किरण अडागळे

सातारा जिल्हा परिषदेमध्ये नोकरी मिळवून देण्याचे आमिष दाखवून सातारा येथील एका वकिलाने त्याच्या दोन साथीदारांसह सव्वा पाच लाख रुपयांची फसवणूक केली. या प्रकरणी सातारा शहर पोलिस ठाण्यात वकील तय्यब आलमगीर मुल्ला व त्याचे दोन साथीदार रमेश माने आणि आशिष माने यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तक्रारदार सुनील नारायण मोरे यांच्या मुलाला पदवीधर होऊन नोकरी शोधत असताना वकील मुल्ला यांच्या संपर्कात आला. मुल्ला याने सांगितले की, जिल्हा परिषदेमध्ये एक जागा भरण्यासाठी ५०,००० रुपये द्यावे लागतील. त्यानंतर तक्रारदारांना आशिष माने याची ओळख करून देण्यात आली, जो त्याच्या मुलाला नोकरी मिळवून देईल असे सांगितले. तक्रारदारांनी ऑनलाइन पैसे पाठवले, तसेच इतर आठ युवकांनाही वकिलांनी पैसे घेतले.त्यानंतर वकील मुल्ला याने नियुक्ती पत्र दिले, परंतु त्यानुसार नोकरी मिळाली नाही. त्यामुळे तक्रारदारांना लक्षात आले की, त्यांना फसवले गेले आहे. पोलिसांनी गुन्हा दाखल करून एकाला अटक केली आहे. तसेच, तक्रारदारांनी पैसे मागितले असता, त्यांना खंडणीचा गुन्हा दाखल करण्याची धमकी देण्यात आल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

हा अर्थसंकल्प जन सामान्यांची फसवणूक करणारा-दिनेश चोखारे

चंद्रपूर । प्रतिनिधी


आज सादर झालेला केंद्राच्या अर्थसंकल्पामध्ये वाढत्या महागाईबद्दल तरतूद नाही. दरडोई उत्पन्नात आपण १४७ क्रमांकावर आहोत. लोकांचे सरासरी वार्षिक उत्पन्न वाढवण गरजेचे होते मात्र तसे दिसत नाही, शेतीविषय धोरणांसंदर्भात कुठल्याही प्रकारची आकडेवारी जाहीर करण्यात आलेली नाही. अर्थमंत्र्यांनी कृषी विभागाचं कौतुक केले . परंतु त्यांची प्रमुख मागणी हमी भाव मिळण्याचा कायदा याबाबत काहीच केले नाही. आजही राज्यात दररोज ७ शेतकरी आत्महत्या करतायत. नवीन शैक्षणिक धोरण राबवण्यात येणार आहे. त्यांची आर्थिक तरतूद दाखवण्यात आलेली नाही. तसेच लघुउद्योगांसाठी कुठल्याही प्रकारची ठोस धोरणे नसल्याने अर्थ व्यवस्थेला हवा तेवढा उपयोग होऊ शकलेला नाही. आज सादर झालेला अर्थसंकल्प हा जन सामान्यांची फसवणूक करणारा आहे. या अर्थसंकल्पात बेरोजगार युवक, शेतकरी, जनसामान्यांकरीता कुठलेही स्थान नसल्याचे दिसून येत असल्याची प्रतिक्रिया कृषी उत्पन्न बाजार समिती चंद्रपूरचे माजी सभापती तथा संचालक जिल्हा कॉंग्रेस कमिटी, चंद्रपूरचे जिल्हा उपाध्यक्ष दिनेश दादापाटील चोखारे यांनी वक्त केल्या आहे.



कुटुंबांचे होणार आरोग्य सर्वेक्षण, नागरिकांना सहकार्याचे आवाहन

वर्धा । प्रतिनिधी

वर्धा जिल्ह्यात आरोग्य क्षेत्रातील सुधारणा आणि धोरणात्मक निर्णयांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी १ फेब्रुवारी ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत निवडक कुटुंबांचे आरोग्य सर्वेक्षण करण्यात येणार आहे.



या सर्वेक्षणाद्वारे राज्यस्तरीय आरोग्य धोरणांसाठी महत्त्वाची माहिती संकलित केली जाईल. सर्वेक्षण प्रक्रियेत सहभागी होणाऱ्या नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा सांख्यिकी अधिकाऱ्यांनी केले आहे.या सर्वेक्षणातून विविध आजारांचे प्रमाण, नागरिकांच्या आरोग्यविषयक समस्या तसेच आरोग्य सेवांबाबतची माहिती गोळा करण्यात येणार आहे. यामुळे आरोग्यविषयक निर्णय अधिक प्रभावी आणि सर्वसमावेशक होण्यास मदत होईल.

सांघिक भावना वाढीसाठी खेळ महत्वपूर्ण-जिल्हाधिकारी विनय गौडा

जिल्हास्तरीय महसूल क्रीडा स्पर्धेचा शुभारंभ

चंद्रपूर । प्रतिनिधी

अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये विविध प्रकारचे कलागुण व कौशल्य असतात. क्रीडा स्पर्धांच्या माध्यमातून हे कलागुण व कौशल्य दाखविण्यासाठी मंच उपलब्ध होत असतो. अशा स्पर्धांमधून अधिकारी व कर्मचारी एकत्रित आल्याने सांघिक भावना वाढण्यास मदत होत असून त्यासाठी खेळ महत्वपूर्ण आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी केले. जिल्हा क्रीडा स्टेडियम येथे आयोजित जिल्हास्तरीय महसूल क्रीडा स्पर्धेच्या उद्घाटनाप्रसंगी ते बोलत होते.



यावेळी वरोराचे उपविभागीय अधिकारी जेनीथ चंद्रा, गोंडपिपरीच्या उपविभागीय अधिकारी अपूर्वा बासुर, परीविक्षाधीन जिल्हाधिकारी कश्मीरा संख्ये, निवासी उपजिल्हाधिकारी दगडू कुंभार, उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) अतुल जटाळे, उपजिल्हाधिकारी शुभम दांडेकर, राजूराचे उपविभागीय अधिकारी रवींद्र माने, मूलचे उपविभागीय अधिकारी अजय चरडे, उपविभागीय अधिकारी संजय पवार तसेच महसूल विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.जिल्हाधिकारी श्री. गौडा म्हणाले, जिल्हा महसूल व क्रीडा स्पर्धा दरवर्षी आयोजित केल्या जातात. या निमित्ताने अधिकारी व कर्मचाऱ्यांना आपले कलागुण आणि विशेष कौशल्य दाखविण्यासाठी मंच मिळतो. स्पर्धेच्या माध्यमातून संघ भावना वाढीस लागते. सर्व कर्मचाऱ्यांनी एकत्रित येऊन या क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी व्हावे व आपल्या अंगी असणारे कौशल्य दाखवावे. पुढील आठवड्यांमध्ये विभागीय स्पर्धा होणार असून त्याचा फायदा कर्मचाऱ्यांना होणार आहे. क्रीडा स्पर्धांमुळे शारीरिक व मानसिक आरोग्य चांगले राखण्यास मदत मिळते.प्रस्ताविकेत बोलताना, सीमा गजभिये म्हणाल्या, वर्षभर कार्यालयीन कामकाजामध्ये सतत व्यस्त असणाऱ्या महसूल कर्मचाऱ्यांसाठी विरंगुळा म्हणून या क्रीडा स्पर्धा महत्त्वाच्या असणार आहे. तत्पूर्वी, जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते मशाल प्रज्वलित करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात १०० मीटर धावणे या क्रीडा खेळाने करण्यात आली.

अनुसुचित जाती व नवबौद्ध घटकांच्या स्वयंसहायता बचत गटांना मिनी ट्रॅक्टर व उपसाधनांचा पुरवठा

चंद्रपूर । प्रतिनिधी

अनुसुचित जाती व नवबौद्ध घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटाना मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने पुरवणे या योजनेत अमुलाग्र बदल करण्यात आला आहे. या योजनेअंतर्गत लाभार्थी बचत गटाला देण्यात येणारे (अर्थसहाय्य) हे वस्तू स्वरुपात न देता मंजूर अर्थसहाय्य हे रक्कम रु. ३.१५ लाख रुपये बचत गटाच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा करण्यात येणार आहे.

योजनेच्या अटी व शर्ती :

स्वयंसहाय्यता बचत गटातील सदस्य महाराष्ट्राचे रहिवासी असावे. बचत गटातील किमान ८० टक्के सदस्य तसेच बचत गटाचे अध्यक्ष व सचिव हे अनुसुचित जाती व नवबौध्द घटकातील असावेत. बचत गटाचे राष्ट्रीयकृत बँकेत बचत गटाच्या नावे बँक खाते असावे व सदरचे बँक खाते बचत गटाचे अध्यक्ष व सचिव यांचे आधार क्रमांकाशी संलग्न असावे. स्वयंसहाय्यता बचत गटाने खरेदी केलेला मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने ही भारत सरकारचे चळपळींीू ेष रसीळर्लीश्रींीिश, षरीाशीी थशश्रषरीश ऊशर्रिींाशपीं ेष रसीळर्लीश्रींीिश, उे-जशिीरींळेप रपव षरीाशीी थशश्रषरीश यांनी निर्धारित केल्यानुसार फार्म, मशिनरी, ट्रेनिंग आणि टेस्टींग इन्स्टीट्युट यांनी टेस्ट करुन जाहीर केलेल्या उत्पादकांच्या यादीतील परिमाणानुसार असावेत.

पात्र स्वयंसहाय्यता बचत गटांना शासनाने त्या-त्या जिल्ह्यासाठी निश्चित करुन दिलेल्या उदिष्टांनुसार अर्थसहाय्य मंजुर करुन त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येईल.

योजनेच्या लाभासाठी निवड झालेल्या स्वयंसहाय्यता बचत गटाला त्यांनी खरेदी केलेले मिनी ट्रॅक्टर चालविण्याचे अधिकृत संस्थेकडून प्रशिक्षण घेणे व त्याचे प्रमाणपत्र सादर करावे लागेल.

स्वयंसहाय्यता बचत गटाने खरेदी केलेले मिनी ट्रॅक्टर उपसाधने अर्थसहाय्य घेतल्यानंतर सदर मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाथने विकता येणार नाही किंवा गहाण ठेवता येणार नाही. तशा आशयाचे हमीपत्र स्वयंसहाय्यता बचत गटाला द्यावे लागेल. तसेच प्रत्येक वर्षी १० वर्षापर्यंत त्याबाबत प्रमाणपत्रास मंजूरी देणाच्या सक्षम प्राधिकाऱ्याकडे सादर करणे बंधनकारक असेल. ज्या स्वयंसहाय्यता बचत गटांनी पॉवर ट्रिलर किंवा मिनी ट्रॅक्टर योजनेचा लाभ घेतला आहे, त्या बचत गटांना यायोजनेचा लाभ घेता येणार नाही.

पात्र स्वयंसहाय्यता बचत गटांनी सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, दुध डेअरी रोड, जल नगर वार्ड, चंद्रपूर येथे संपर्क साधून अर्ज करावा, असे आवाहन समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त यांनी केले आहे.

जिल्ह्याच्या विकासासाठी वाढीव निधीकरीता प्रयत्न करणार पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन समितीची बैठक

चंद्रपूर । प्रतिनिधी

सन २०२५-२६ करीता शासनाने चंद्रपूर जिल्ह्यासाठी ३४० कोटी ८८ लक्ष रुपयांचा नियतव्यय मंजूर केला असला, तरी यात वाढ करून सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनेकरीता ६४० कोटी, अनुसूचित जाती उपयोजना अंतर्गत १०० कोटी तर आदिवासी उपयोजना अंतर्गत २०० कोटी रुपये, असे एकत्रित ९४० कोटी रुपयांच्या वाढीव प्रस्तावाची मागणी राज्यस्तरीय बैठकीत केली जाईल. जिल्ह्याच्या विकासासाठी जास्तीत जास्त निधी उपलब्ध करून देण्याचा आपला प्रयत्न आहे, अशी ग्वाही राज्याचे आदिवासी विकास मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक उईके यांनी दिली.नियोजन सभागृह येथे आयोजित जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी आमदार सर्वश्री सुधाकर अडबाले, सुधीर मुनगंटीवार, किशोर जोरगेवार, देवराव भोंगळे, करण देवतळे, विजय वडेट्टीवार यांच्यासह जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा पोलिस अधिक्षक मुम्मका सुदर्शन, प्रभारी मुख्य वनसंरक्षक पियुषा जगताप, जिल्हा नियोजन अधिकारी संजय कडू व विविध यंत्रणेचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलतांना पालकमंत्री डॉ. अशोक उईके म्हणाले, राज्य शासनाने चंद्रपूर जिल्ह्यासाठी सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनेची कमाल वित्तीय मर्यादा ३४० कोटी ८८ लक्ष रुपये ठेवली आहे. यात ३०० कोटींची वाढ करून ६४० कोटी, अनुसूचित जाती उपयोजना करीता असलेल्या ७५ कोटीमध्ये २५ कोटींची वाढ करून १०० कोटी रुपये तर आदिवासी उपयोजनेकरीता असलेल्या १११ कोटींमध्ये ८९ कोटींची वाढ करून २०० कोटी रुपये असे एकूण ९४० कोटींची मागणी करण्यात येईल. विशेष म्हणजे जिल्ह्यातील कार्यान्वयीन यंत्रणांची एकूण मागणी १०५९ कोटींची आहे.



पुढे पालकमंत्री डॉ. उईके म्हणाले, जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत जे अधिकारी विनापरवानगी गैरहजर असतील त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावावी. जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून मामा तलावाच्या दुरुस्तीकरणासाठी स्वतंत्र निधी देण्याबाबत शासन निर्णयात बदल करण्याचा प्रयत्न केला जाईल. तसेच अनेक गावांमध्ये स्मशानभुमी शेड, स्मशानभुमी पोहच रस्ते नसल्याने ही कामे प्राधान्याने घेऊन त्यासाठी निधी उपलब्ध केला जाईल. हर घर जल योजनेचे काम त्वरीत पूर्ण करावे. तसेच मागणी असेल तेथे महावितरण कंपनीने ट्रान्सफार्मर उपलब्ध करून द्यावे. सर्व आमदारांच्या सुचना लक्षात घेऊन जिल्ह्यासाठी वाढीव निधीची तरतूद राज्यस्तरीय बैठकीत करण्यात येईल, अशी ग्वाही राज्याचे आदिवासी विकास मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक उईके यांनी दिली.विविध बाबींसाठी राखीव निधी : जिल्ह्यातील एकूण नियतव्ययाच्या, महिला व बालकल्याण विभागासाठी ३ टक्के राखीव निधी, गतिमान प्रशासन अंतर्गत ५ टक्के राखीव निधी, शिक्षण अंतर्गत ५ टक्के राखीव निधी, पर्यटन व गडकिल्ले अंतर्गत ३ टक्के राखीव निधी, गृह विभाग अंतर्गत ३ टक्के राखीव निधी तर शाश्वत विकास ध्येय करीता १ टक्का राखीव निधी ठेवण्याची तरतूद करण्यात आली आहे.

गझल ही माणसाला माणसाच्या जवळ आणण्याचे काम करते-डॉ.संदीप गुप्ते

अंबाजोगाई । प्रतिनिधी

गझल ही माणसाला माणसाच्या जवळ आणण्याचे काम करते असे मत ख्यातनाम मराठी उर्दू गझलकार डॉ. संदीप गुप्ते यांनी व्यक्त केले.अंबाजोगाई येथे साधना प्रतिष्ठान च्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या दुसऱ्या अखिल भारतीय एल्गार मराठी गझल संमेलनाचे उद्घाटन म्हणून डॉ. संदीप गुप्ते बोलत होते.येथील नगर परिषदेच्या आद्य कवी मुकुंदराज स्वामी सांस्कृतिक सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाच्यावेळी यावेळी व्यासपीठावर संमेलनाध्यक्ष डॉ. दिलीप पांढरपट्टे, उद्घाटक संदीप गुप्ते, माजी संमेलनाध्यक्ष शिवाजी जवरे, पुरस्कार मुर्ती गझल गंधर्व सुधाकर कदम, डॉ. सुरेश खुरसाळे, नंदकिशोर मुंदडा, पृथ्वीराज साठे, नाना लोढम, माजी स्वागताध्यक्ष डॉ. प्रा. सदाशिव सूर्यवंशी, गझलकार प्रशांत वैद्य, प्रतिष्ठानच्या कार्याध्यक्ष डॉ. शुभदा राठी, सुनील जाधव, सचीव गोरख शेंद्रे हे उपस्थित होते.

आपल्या विस्तारीत भाषणात डॉ. संदीप गुप्ते पुढे म्हणाले की, गझल ही माणसाला माणसाशी जवळ जोडण्याचे, जवळ आणण्याचे काम करते. मराठी गझलेने सतत संदेश वाहक म्हणून सातत्याने काम केले आहे. गझल जरी मुळची भारतीय नसली तरी ती भारतात आल्यानंतरच सजली, नटली आणि सौंदर्यवती ही झाली. इराणी सौंदर्यवती च्या डोळ्यातील काजळ म्हणजे मराठी गझल आहे असे मत त्यांनी व्यक्त केले.

मराठी गझलेने सुरेश भटांच्या काळापासून सामाजिक आशयाचा व्यापकपणा गाठला आहे. मराठी गझला या सातत्याने समाजातील घटनांवर परखड भाष्य करण्याची क्षमता असलेल्याच लिहिल्या गेल्या आहेत असे सांगत नवोदित गझलकारांना मार्गदर्शन करताना डॉ. संदीप गुप्ते पुढे म्हणाले की, गझलेत काय म्हटलंय या पेक्षा कसं म्हटलंय याला जास्त महत्त्व आहे. त्यामुळे गझल लिहितांना नवोदित गझलकारांनी प्रत्येक शेर कसा दमदार होईल याकडे अधिक लक्ष दिले पाहिजे. त्याही पेक्षा अधिक महत्त्वाचे म्हणजे शंभर शेर वाचल्यानंतरच एक शेर लिहिला पाहिजे असे सांगितले. आपल्या भाषणात त्यांनी अनेक दर्जेदार मराठी गझलकारांच्या नावांचा उल्लेख करीत नवोदित गझलकारानी त्यांच्या गझलांचा अभ्यास केला पाहिजे असे सांगितले.

भारतात सर्व धर्मियांची एकूण २५ लाख पुजा स्थळे आहेत, यातुलनेत देशात शाळा आणि रुग्णालयांची संख्या फक्त ५ लाख आहे. हा क्रम उलटला झाला तर भारताची साहित्यिक आणि सामाजिक समृद्धता बदलण्यास सुरुवात होईल असं मत त्यांनी व्यक्त केले.या कार्यक्रमात गझल साधना पुरस्काराने गौरविण्यात आलेल्या गझल गंधर्व सुधाकर कदम यांनी आपल्या सत्काराला उत्तर देताना

प्रख्यात गझलकार सुरेश भट यांच्या सहवासात राहिल्यामुळे आज आपण इथपर्यंत पोहोचलो असल्याचे सांगत

सुरेश भटांच्या काही गझल स्वरबद्ध करण्याची संधी मला मिळाली तेंव्हापासून सुरेश भट आणि मी यांनी गझलेवर काही काम करण्याचा निर्णय घेतला. सुरेश भट यांच्या भेटी नंतर मला या क्षेत्रात काम करण्याची दिशा मिळाली आणि आज मी त्यांच्याच मुळे इथपर्यंत पोहोचलो आहे.

सुरेश भट यांच्या सोबत मराठी गझल आणि मराठी गझल गायीकेचा प्रसार करण्याचे कामास माझी सुरुवात झाली. गझल गायीकीचा प्रचार आणि प्रसार हे एक मिशन आहे. ते सतत सुरू राहीले पाहिजे असा



आशावाद त्यांनी व्यक्त केला.या कार्यक्रमात माजी संमेलनाध्यक्ष शिवाजी जवरे यांनी आपल्या भाषणात मराठी गझलेला खुप चांगले भविष्य आहे. आजच्या आणि कालच्या गझलेत खुप चांगले आणि आशादायक अंतर असून गझलेचे भविष्य ऊंचावणारे असल्याचे त्यांनी सांगितले.

या उद्घाटन सोहळ्याचा समारोप करताना प्रख्यात गझलकार संमेलनाध्यक्ष डॉ. दिलीप पांढरपट्टे यांनीया दुसऱ्या अखिल भारतीय एल्गार मराठी गझल संमेलनाच्या अध्यक्ष पदावरून आपणा सर्वांना संबोधित करताना मला खूप आनंद वाटतो आहे. कारण मराठवाड्याची सांस्कृतिक राजधानी अशी ओळख असलेल्या 'शिक्षणाचे माहेरघर' म्हणून प्रसिद्ध असलेल्या, मराठी कवितेची, मराठी भाषेची व वाङ्मयाची जन्मभूमी असलेल्या मुकुंदराज, दासोपंत आणि स्वामी रामानंद तीर्थ यांच्या या अद्भुत अंबाजोगाई नगरीत गझलकरांचा हा उत्स्फूर्त 'एल्गार' आपण सर्वजण पाहतो व अनुभवतो आहोत.गजलच्या आजवरच्या अनेक संमेलनांमधून अनेक गजलकारांना गजल लिहिण्यासाठी प्रोत्साहन व ऊर्जा मिळत आलेली आहे व मी स्वतः याचा साक्षीदार आहे. संमेलनांमधील मुशायरे, परिसंवाद, मुक्त चर्चा, गजल गायनाच्या मैफली ही रसिकांसाठी केवळ एक पर्वणी नसून त्यानिमित्ताने मोठ्या प्रमाणात नव्या गजलकारांना व गायकांना ऐकण्याची तसेच परिसंवाद, चर्चा-सत्रांमधून गजलेबद्दलच्या आपल्या जाणिवा रुंदावण्याची संधी गजलकार व रसिकांना या संमेलनांमधून मिळत असते.आपल्या विस्तारीत भाषणात डॉ. दिलीप पांढरपट्टे यांनी मराठी गझलकार सुरेश भट यांच्या सह विविध ज्येष्ठ उर्दू आणि मराठी गझलकारांच्या गझलांचा संदर्भ देत नवोदित गझलकारांनी जास्त वाचन करुन कमी पण कसदार गझल लिहाव्यात असे आवाहन केले. साधना सेवाभावी संस्था आणि तिचे अध्वर्यू असणारे आमचे मित्र- खरे तर जगन्मित्र- उत्साहमूर्ती दगडू लोमटे यांचे मी या संमेलनाच्या धाडसी व कल्पक आयोजनाबद्दल मनापासून अभिनंदन करतो व त्यांना तहे-दिलसे शुक्रिया अदा करतो. मराठी [illegible] गजल संमेलनाची ही परंपरा खंडित होऊ नये; तर नव्या जोमाने आणि नव्या उत्साहाने नवनवीन प्रांतांमध्ये त्यांचे आयोजन व्हावे असे माझ्याप्रमाणे सर्वच गजलप्रेमींना वाटते. माझेच शब्द मी उसने घ्यायचे ठरवले तर' नसे फक्त हा सोहळा अक्षरांचा नसे बहर हा फक्त पाना फुलांचा मरुभूमी ही जीवघेण्या व्यथांची गजल हा इथे कारवा वेदनांचा यापुढेही हा अद्भुत अक्षरांचा सोहळा, हा रंगीबेरंगी पानाफुलांचा बहर, हा आनंद व्यथा- वेदनांचा अलबेला कारवा अशा एल्गार संमेलनांच्या रुपाने यापुढेही नवनवीन क्षितिजांना गवसणी घालत राहील असा मला विश्वास वाटतो असे सांगितले.आपल्या प्रास्ताविक दगडू लोमटे यांनी साधना सेवाभावी संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या दुसऱ्या अखिल भारतीय एल्गार मराठी गझल संमेलनाच्या आयोजनात मागील भुमिका स्पष्ट केली. १९८३ साली अंबाजोगाई येथे झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात प्रख्यात गझलकार सुरेश भट यांच्यावर संपुर्ण महाराष्ट्रात टीकेची झोड उडाली असतांनाच याच संमेलनात तीन तास सुरेश भट यांच्या गझलेचा कार्यक्रम घेणारं हे गाव तेंव्हापासून गझलेच्या प्रेमात पडलेले गाव आहे. त्यामुळे या गावात दुसरे गझल संमेलन या शहरात मला घेता आले याचा मनस्वी आनंद होत असल्याचे त्यांनी सांगितले.आपल्या प्रास्ताविकात स्वागताध्यक्ष दगडू लोमटे यांनी साधना सेवाभावी संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या दुसऱ्या अखिल भारतीय एल्गार मराठी गझल संमेलनाच्या आयोजनात मागील भुमिका स्पष्ट केली. १९८३ साली अंबाजोगाई येथे झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात प्रख्यात गझलकार

विंजासन रोडच्या दुतर्फा नाल्यांचे काँक्रीटीकरण करा

माजी नगराध्यक्ष सुनील नामोजवार यांची मागणी



भद्रावती । प्रतिनिधी

स्थानिक विजासन रोडवरील बजरंग चौक ते अरुणोदय इंटरप्राईजेस पर्यंत प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेतून रस्ता तयार करण्यात आला. मात्र या रस्त्याच्या दोन्ही बाजूला नाल्यांचे बांधकाम न झाल्याने साधारणतः १० फूट खोल खाई तयार झाली आहे. रस्ता अरुंद असल्यामुळे व रस्त्याच्या दुतर्फा खोल खाईमुळे या रस्त्यावरून जाणे येणे करणाऱ्यांना आपला जीव मुठीत घेऊन चालावे लागत आहे. रस्त्याच्या दुतर्फा असलेली ही खाई नालीमध्ये रूपांतरित करणे, तिचे बांधकाम करणे ही नगरपालिका प्रशासनाची जबाबदारी आहे. परंतु पालिका प्रशासनाकडून त्याकडे दुर्लक्ष होत असल्यामुळे हा रस्ता जाणाऱ्या येणाऱ्यांसाठी अपघातासाठी आमंत्रण ठरला आहे. जाणारे येणारे वाहन चालक अक्षरशः जीव मुठीत घेऊन चालत आहे. कधी अपघात होईल हे सांगता येत नाही.परवाच या रोडवर मोठा अपघात झाला.जिवित हानी झाली नसली तरी दोन्ही वाहनचालकांचे नुकसान झाले आहे. या रोडवर अधूनमधून अपघाताचे प्रमाणात वाढ झाली आहे. ते टाळण्यासाठी पालिकेने या नालीत ९० एमएम पाईप सिमेंट बांधकाम करणे आवश्यक आहे. पालिकेकडे या कामाचा पाठपुरावा करणे हे नगरसेवकांचे काम आहे. परंतु त्यांचा कालावधी संपल्यानंतर तेही आता पद नसल्याने शांत बसले आहे. पालिकेने जनतेच्या जीविताचे जतन करण्यासाठी व जीवितहानी होऊ नये यासाठी या दोन्ही बाजूला नाल्यांचे बांधकाम त्वरीत करावे अशी मागणी भारतीय जनता पक्षाचे जिल्हा सचिव तथा माजी नगराध्यक्ष सुनील नामोजवार यांनी केली आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेच्या बळकटीसाठी ठोस निर्णयांचा अर्थसंकल्प-आ.किशोर जोरगेवार

चंद्रपूर । प्रतिनिधी

केंद्रीय अर्थसंकल्प २०२५ हा आत्मनिर्भर भारताच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सादर केलेला हा अर्थसंकल्प सर्वसमावेशक विकासावर भर देणारा आहे. मध्यमवर्गीय नागरिक, शेतकरी, उद्योजक आणि तरुणांना प्रोत्साहन देणाऱ्या योजनांचा यात समावेश असून भारतीय अर्थव्यवस्थेच्या बळकटीसाठी ठोस निर्णयांचा हा अर्थसंकल्प असल्याचे प्रतिक्रिया आमदार किशोर जोरगेवार यांनी दिली आहे.

गरीब, तरुण, महिला आणि शेतकरी यांच्या विकासावर लक्ष केंद्रित केले जाईल, असे अर्थसंकल्पात नमूद करण्यात आले आहे. शेतकऱ्यांसाठी देखील मोठ्या घोषणा करण्यात आल्या असून, धनधान्य योजना सुरू करण्याची घोषणा अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी केली आहे. तसेच, किसान क्रेडिट कार्डची मर्यादा ३ लाखांवरून ५ लाखांपर्यंत वाढवण्यात येणार असल्याचे त्यांनी जाहीर केले. कृषी क्षेत्रासाठी दिलेल्या विशेष तरतुदींमुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढेल आणि आधुनिक शेतीला चालना मिळेल. त्याचप्रमाणे, पायाभूत सुविधा, उद्योग आणि उत्पादन क्षेत्रासाठी भरीव तरतुदी केल्यामुळे नव्या रोजगाराच्या संधी निर्माण होणार आहेत. मध्यमवर्गीयांसाठी करसवलतींची तरतूद ही जनसामान्यांना मोठा दिलासा देणारी आहे. तसेच, नवीन स्टार्टअपसाठी भांडवली गुंतवणुकीला



चालना देणाऱ्या योजनांमुळे युवकांना नवीन संधी उपलब्ध होतील.

शहरी कामगारांचे जीवनमान उंचावण्यासाठी अर्थसंकल्पात महत्त्वाच्या घोषणा करण्यात आल्या आहेत. उत्पादन क्षेत्रात अधिकाधिक युवकांना संधी मिळावी यासाठी त्यांच्या कौशल्य विकासावर भर दिला जाणार आहे. तसेच, पर्यटन क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर काम केले जाणार असून, ५० नवी पर्यटन स्थळे विकसित करण्याची घोषणा करण्यात आली आहे. महत्त्वाच्या ३६ औषधांवरील कस्टम ड्युटी हटविण्यात आल्याने औषधे स्वस्त होतील, ज्याचा थेट फायदा सर्वसामान्य नागरिकांना मिळणार आहे. एकंदरीत, हा अर्थसंकल्प आर्थिक स्थैर्य, गुंतवणूक वाढ, रोजगारनिर्मिती आणि सर्वसमावेशक विकासाला चालना देणारा असून, भारतीय अर्थव्यवस्थेला बळकट करणारा आहे. देशाच्या प्रगतीसाठी हा संकल्प अत्यंत महत्त्वाचा ठरेल, अशी प्रतिक्रिया आमदार किशोर जोरगेवार यांनी दिली आहे.

महात्मा गांधी पुण्यतिथी सप्ताहानिमित्त हिंगणघाट येथे मॅरेथॉनचे आयोजन

वर्धा । प्रतिनिधी

महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथी सप्ताहानिमित्त रन फॉर लेप्रसी मॅरेथॉनचे आयोजन हिंगणघाट येथे करण्यात आले. या मॅरेथॉनमध्ये सुमारे ३०० स्पर्धकांनी उत्साहाने सहभाग घेतला.

बिडकर कॉलेज येथून मॅरेथॉनची सुरुवात झाली तर समारोप पंचायत समिती येथे करण्यात आला. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनानंतर विजेत्यांना पारितोषिके व प्रमाणपत्रांचे वितरण वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमाला प्रमुख सहाय्यक संचालक कुष्ठरोग डॉ. स्वप्रिल बेले, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. हेमंत पाटील, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रभाकर नाईक, डीएनटी टीम वर्धाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. येळणे तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.या मॅरेथॉनच्या माध्यमातून कुष्ठरोगाबद्दल जागृती आणि समाजातील आरोग्याबाबत सकारात्मक संदेश देण्याचा उद्देश साध्य करण्यात आला.



जिल्हास्तरीय हिराई व मिनी सारस महोत्सवाचे उद्घाटन

बचत गटाच्या माध्यमातून महिला आत्मनिर्भर-पालकमंत्री डॉ.अशोक उईके



चंद्रपूर । प्रतिनिधी

चंद्रपूर जिल्ह्यात महिला बचत गटांचे अतिशय उत्तम काम आहे. या बचत गटाच्या उत्पादनांना बाजारपेठ मिळावी, यासाठी जिल्हा प्रशासन, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा आणि उमेद विविध उपक्रम राबवित आहे. अशा उपक्रमातूनच महिला आत्मनिर्भर होण्यास हातभार लागणार असून पंतप्रधानांच्या विकसीत भारत संकल्पनेत चंद्रपूरचे निश्चितच योगदान राहील, अशी ग्वाही राज्याचे आदिवासी विकास मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक उईके यांनी दिली. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, उमेद, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने, महिला स्वयंसहाय्यता समुहामार्फत उत्पादित वस्तूंचे प्रदर्शन व विक्रीकरीता चांदा क्लब ग्राऊंड, येथे जिल्हास्तरीय हिराई महोत्सव व मिनी सरस प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाचे उद्घाटन करतांन पालकमंत्री डॉ. अशोक उईके बोलत होते. यावेळी मंचावर आमदार सर्वश्री सुधाकर अडबाले, किशोर जोरगेवार, देवराव भोंगळे, करण देवतळे, जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा पोलिस अधिक्षक मुम्मका सुदर्शन, प्रभारी मुख्य वनसंरक्षक पियुषा जगताप, उपमुख्य कार्यकारी अधिकारी मिना साळूंके, गिरीश धायगुडे, नुतन सावंत उपस्थित होते.

देशाचे पतंप्रधान नरेंद्र मोदी यांनी विकसीत भारताचा संकल्प केला आहे, असे सांगून पालकमंत्री डॉ. उईके म्हणाले, बचत गटाच्या माध्यमातून एक चांगला उपक्रम प्रशासनाने आयोजित केला असून जिल्ह्यात महिला बचत गटाचे जाळे मोठ्या प्रमाणात विस्तारले असून त्यातून अनेकांना रोजगार उपलब्ध झाला आहे. महिलांच्या आत्मनिर्भरतेकडे टाकलेले हे एक पाऊल आाहे. या जिल्ह्याचा पालकमंत्री म्हणून जिल्ह्याचा सर्वांगीन विकास करण्यासाठी कटिबध्द आहे. महिलांच्या कोणत्याही तक्रारी किंवा अडीअडचणी असतील तर प्रशासनाने त्या त्वरीत सोडवाव्यात. महिलांचा सन्मान करणे प्रत्येकाचे कर्तव्य आहे, असेही ते म्हणाले.यावेळी पालकमंत्री डॉ. अशोक उईके यांच्या हस्ते उत्कृष्ट कार्य करणारे महिला ग्रामसंघ, लखपती दिदी योजनेतर्गत महिलांचा सन्मान, संत गाडगेबाबा स्वच्छ भारत मिशन अंतर्गत ग्रामपंचायतींचा सन्मान करण्यात आला. तत्पूर्वी पालकमंत्री डॉ. अशोक उईके यांनी विविध स्टॉल तसेच पशुप्रदर्शनीची पाहणी केली. यावेळी त्यांच्या हस्ते बचत गटाच्या व्यापारी संकुलाचे ई-भुमीपुजन करण्यात आले. प्रास्ताविकेत मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन म्हणाले, पाच दिवसीय या महोत्सवात महिला बचत गटांचे स्टॉल, आरोग्य तपासणी, महिलांची कॅन्सर तपासणी, पशुप्रदर्शनी, विविध योजनांची माहिती देणारे स्टॉल आदी लावण्यात आले आहेत. तसेच जिल्ह्यात महिला बचत गटांना आतापर्यंत ३६२ कोटींचे वाटप करण्यात आले असून चंद्रपूर जिल्हा यात राज्यात प्रथम क्रमांकावर आहे. कार्यक्रमाचे संचालन ऐश्वर्या भालेराव यांनी केले. तर आभार उपमुख्य कार्यकारी अधिकारी मिना साळूंके यांनी मानले. कार्यक्रमाला जिल्हा परिषदेच्या विविध विभागाचे प्रमुख, गटविकास अधिकारी तसेच मोठ्या संख्येने बचत गटाच्या महिला उपस्थित होत्या.विविध गृहपयोगी उत्पादने विक्रीस उपलब्ध : प्रदर्शनीमध्ये विविध गृहपयोगी उत्पादने विक्रीस उपलब्ध राहणार आहेत. यामध्ये लोणचे, विविध प्रकारच्या चटण्या, कडधान्य, मसाल्याचे पदार्थ, खाद्यपदार्थ, लांबपोळी, पुरणपोळी, झुनका भाकर, मोहाची भाकर, जवस चटण्या, मातीचे भांडे, लोकरी वस्तु, लाकडी शिल्प, शोभीवंत वस्तू, हातसळीचे तांदूळ, कापडी बॅग, टेराकोटा, गांडूळखत आदींचा समावेश आहे.